लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/




जळगाव ■ अंक – २५० ■ शुक्रवार, दि.१९ जुलै २०२४ | संपादिका : सौ. शांता वाणी | ■ पाने ६ ■ किंमत ३ रु. ■ RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | lokshahilive@gmail.com

## सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : ७४,५१०
- चांदी (प्रति १ किलो): ९१,७४०

## तापमान

- कमाल : ३७ अंश सेल्सिअस
- किमान : २० अंश सेल्सिअस

## महत्वाचे

### जीप अपघातात सात भाविक ठार

**जालना :** जालना ते राजूर मार्गावर भरधाव काळ्या-पिवळ्या जीपचा आणि दूचाकीची धडक होऊन जीपच्या चालकाचे नियंत्रण चुकल्याने जीप थेट विहीरीत कोसळून मोठा अपघात झाला आहे. या गंभीर अपघातात सात भाविक ठार झाले तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जालना येथे उपचारासाठी हलवण्यात आले आहे. या जीपमध्ये एकूण १३ प्रवासी भाविक दाटीवाटीने बसले होते अशी माहिती उघडकीस आली आहे. जालना ते राजूर मार्गावर तुपेवाडी जवळ हा अपघात घडला आहे. खडेश्वर बाबा मंदिर ते वसंत नगर ( राजूर जवळील ) येथे दुचाकी आणि काळी पिवळीचा हा अपघात झाला. चारचाकी वाहन विहिरीत कोसळल्याने त्यातील १३ जण जखमी झाले आहेत. या विहिरीतून सात भाविकांचे मृतदेह काढण्यात आले आहेत तर सहा जण गंभीर जखमी असून त्यांना जालना येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. नेगावचे काही भाविक पंढरपूर येथून बसने जालना येथे आले होते.

### अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना कोरोनाची लागण

**नवी दिल्ली :** दोन वर्षांपूर्वी कोरोना व्हायरसने सर्व जगभरात हाहाकार माजवला होता. यानंतर आता पुन्हा एकदा कोरोनाने एन्ट्री घेतली आहे. नुकत्याच आलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना कोरोनाची लागण झाली आहे. लास वेगासमधील एका परिषदेत बोलण्यापूर्वी त्यांची कोरोवाची टेस्ट करण्यात आली, ज्यामध्ये त्यांना संसर्ग झाल्याचे समोर आले आले. व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी करीन जीन पियरे यांनी याबाबत माहिती दिली आहे. अहवालानुसार, राष्ट्राध्यक्षांना कोरोनाची सौम्य लक्षणे दिसून येत आहेत. यावेळी त्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून ते स्वत: सेल्फ-आइसोलेशनमध्ये आहेत. संसर्गाची लागण झाल्यानंतर त्यांचे आगामी कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.

# दोन योजना महायुतीसाठी ठरणार गेमचेंजर !

## महिला–तरुण वर्गाला खुश करण्याचा प्रयत्न : बेरोजगारीची धार होणार बोथट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यानंतर महायुती विधानसभेच्या तयारीला लागली आहे. अर्थमंत्री अजित पवारांनी अर्थसंकल्पातून अनेक योजना जाहीर केल्या. यापैकी सर्वाधिक चर्चा झाली ती मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची. त्यानंतर कालपासून लाडका भाऊ योजनेची चर्चा सुरु आहे. लोकसभेला संविधान, पक्षफूट, आरक्षण अशा विविध गोष्टींचा फटका महायुतीला बसला. आता विधानसभेला सामोरे जाताना महायुतीने कल्याणकारी योजनांवर भर दिला आहे.

मध्य प्रदेशात भाजपची सत्ता असताना विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडली बेहना योजना आणण्यात आली. त्याचा फायदा भाजपला झाला. भाजपच्या जागा वाढल्या. चांगले बहुमत मिळाले. आता महाराष्ट्रात भाजपने याच योजनेचा आधार घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेच्या लाभार्थी महिलांना पहिला हफ्ता १५ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट दरम्यान देण्यात येईल. याच काळात रक्षाबंधन आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत २१ ते ६० वयोगटातील महिलांना दर महिन्याला १५०० रुपये मिळतील. विवाहित, घटस्फोटित, आर्थिकदृष्ट्या परावलंबी महिलांना



महिन्याकाठी दीड हजार रुपये दिले जातील. कौटुंबिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या महिलांना याचा लाभ मिळेल. महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व्हाव्यात, त्यांचे सक्षमीकरण व्हावे हा लाडकी बहीण योजनेमागचा हेतू आहे.

लाडकी बहीण योजनेवर सरकार ४६ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या योजनेचा लाभ दीड कोटी महिलांना होईल असा अंदाज आहे. लाडकी बहिणच्या माध्यमातून निम्म्या लोकसंख्येला फायदा होईल. त्यामुळे राज्यात मध्य प्रदेशासारखा निकाल लागेल, असा विश्वास महायुतीच्या नेत्यांना आहे. लोकसभेला दुरावलेला महिला मतदारवर्ग लाडकी बहिणच्या माध्यमातून जोडण्याचा सरकारचा प्लॅन आहे. यासोबतच शिंदे सरकारने युवा वर्गासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्य योजना आणली आहे. तरुणांसाठी आणण्यात आलेल्या योजनेला लाडका भाऊ योजना म्हटले जात आहे. ही योजना नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी आहे. त्यानुसार बारावी पास तरुणांना महिन्याला ६ हजार रुपये, डिप्लोमाधारकांना ८ हजार रुपये आणि पदवीधरांना १० हजार रुपये भत्ता म्हणून दिले जातील. सरकारची योजना तरुणांसाठी कल्याणकारी ठरु शकते. त्यामुळे तरुणांमध्ये कौशल्य विकसित होईल. राज्यात कुशल मनुष्यबळ वाढेल. या योजनेवर सरकार ६ हजार कोटी खर्च करणार आहे. योजनेचा लाभ दरवर्षी १० लाख तरुणांना मिळेल.

### मोठ्या लोकसंख्येला होणार लाभ

सरकारने विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून योजना आणल्याचा आरोप होत आहे. पण योजनांचा नीट विचार केल्यास त्याचा लाभ राज्यातील मोठ्या लोकसंख्येला होईल. त्यांच्या हातात थेट पैसा येईल. विरोधकांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या बेरोजगारीच्या मुद्द्याची धार काही प्रमाणात कमी होईल. लाभार्थ्यांची अंदाजित संख्या पाहता या दोन योजना सरकारसाठी गेमचेंजर ठरु शकतात.

# चंदिगढ- डिब्रूगड एक्स्प्रेसचे बारा डबे घसरले

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**लखनऊ** वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशातील गोंडा येथे डिब्रुगढ एक्स्प्रेस रुळावरून घसरली आहे. या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच जवळपास २५ जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. यातील काही जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान जखमींना रुग्णालयात दाखल केले जात आहे. ही ट्रेन चंदीगढवरून डिब्रुगढला जात होती. दरम्यान ट्रेनचे १२ डब्बे रुळावरून घसरले आहेत. चंदीगढमधून ही ट्रेन डिब्रुगढ येथे जात होती. यामध्ये काहीजण



जखमी झाल्याचे वृत्त आहे. तर काही जणांचा जीव गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी वरिष्ठ अधिकारी पोहोचले आहेत. तसेच मदतकार्य सुरु करण्यात आले आहेत. ही अपघाताची घटना गोंडा-मनकापूर स्टेशनजवळ घडली आहे. या अपघातात आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. डिब्रुगड एक्स्प्रेस (१५९०४) ही ट्रेन गुरुवारी रात्री ११.३९ वाजता चंदीगडहून सुटली. गुरुवारी दुपारी ही ट्रेन गोंडा-मानकापूर स्ठानकावर आली असता एक्स्प्रेसचे काही डबे अचानक रुळावरून घसरले. आहेत. प्राथमिक माहितीनुसार, ट्रेनचे १०-१२ डबे रुळावरून घसरले आहेत. गाडी रुळावरून घसरल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे. लोक घाबरून ओरडू लागले होते.

# मनोरमा खेडकर यांना सिनेस्टाईल अटक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मनोरमा खेडकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. संबंधित प्रकरण खरंतर एक वर्षापूर्वीचं आहे. पण पूजा खेडकर यांच्या प्रकरणानंतर आता मनोरमा खेडकर यांचा व्हिडीओ व्हायरल झाला. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीच्या आधारावर मनोरमा खेडकर यांना अटक करण्यासाठी पोलिसांनी विविध पथकं तैनात केली होती. मनोरमा खेडकर या पोलिसांना सहज सापडत नव्हत्या. अखेर महाडमधील एका लॉजमधून



त्यांना अटक करण्यात आली. अतिशय सिनेस्टाईल त्यांना अटक करण्यात आल्यानंतर त्यांना आज दुपारी कोर्टात हजर करण्यात आलं. यावेळी दोन्ही बाजूने जोरदार युक्तिवाद करण्यात आला. हा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने मनोरमा खेडकर यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. "मनोरमा खेडकर यांना सकाळी सव्वा नऊ वाजता महाडमधून अटक केली आहे. पिस्तूल रिकवर करायची आहे. गुन्ह्यात वापरलेली लँड क्रुझर गाडी ताब्यात घ्यायची आहे. आरोपी प्रभावशील व्यक्ती आहे. त्यामुळे सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी", अशी मागणी तपास अधिकाऱ्यांनी केली. "कलम वाढ केलेला अर्ज दाखल केला आहे. आरोपींची राजकीय पार्श्वभूमी आहे. सविस्तर तपास करावा लागेल. गरीब शेतकरी लोकांना न्याय द्यावा लागेल म्हणून कोठडी द्यावी. आरोपी राजकीय प्रभावशील व्यक्ती आहेत. ते फिर्यादींवर दबाव आणू शकतात. तसेच इतर आरोपींना अटक करायची आहे. आरोपींची मुळशी तालुक्यात इतरही ठिकाणीदेखील मोठी जमीन आहे. त्या ठीकाणी त्यांनी शेतकऱ्यांना धमकावले आहे का? याचा तपास करायचा आहे. त्यासाठी पोलीस कोठडी मिळावी", अशी मागणी सरकारी वकिलांनी केली. यावेळी पोलिसांनी खेडकर यांचा व्हायरल व्हिडीओ कोर्टात सादर केला. कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर मनोरमा खेडकर यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.




# आगामी निवडणूक तयारीची आढावा बैठक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नाशिक** प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील निवडणूक तयारीचा आढावा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल घेतला. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीतील त्रुटींचा अभ्यास करुन आगामी विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देशही दिले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती कक्षात नाशिक जिल्ह्यातील मतदार नोंदणी अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन केले होते, त्यावेळी एस. चोकलिंगम् बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, अपर आयुक्त निलेश सागर, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, उपआयुक्त मंजिरी मनोलकर, सहायक आयुक्त विठ्ठल सोनवणे व नाशिक जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते. मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी श्री. चोक्कलिंगम पुढे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीसाठी मतदार यादी अचूक होण्यासाठी प्रयत्न करावेत. १८-१९ वर्षातील व स्त्री मतदार वाढीसाठी वशेष प्रयत्न करावेत. तसेच आगामी विधानसभा निवडणूक कमीत कमी खर्चात कशी सक्षमतेने पार पाडता येईल, यासाठी देखील नियोजन करण्यात यावे. तसेच यावेळी त्यांनी सर्व अधिकाऱ्यांनी नियमानुसार निवडणुकीची कामे करावीत. मतदार यादी, आवश्यक असलेल्या मतदान साहित्याचा आढावा, लोकसभा निवडणुकीच्या खर्चाचा आढावा व आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आवश्यक निधीचा आढावा घेण्यात आला. तसेच स्ट्राँग रूम व मतमोजणी केंद्राचा आढावा घेतला.

# पारोळ्यात नविन वसाहतीत बिबट्याचे दर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

येहील नविन वसाहतीत अशोक नगरच्या आजुबाजूच्या परिसरात दिनांक १७ रोजी रात्री अकरा ते साडे अकरा वाजेच्या सुमारास बिबट्याचा संचार दोन व्यक्तींनी बधीतल्याने नवीन वसाहतीतील रहिवाश्यान मध्ये मोठी घबराहट पसरली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की पारोळा येथील अमळनेर रस्त्यावरील नवीन वसाहतीतील अशोक नगर येथे रात्रीच्या सुमारास बिबट्या दिसल्याने येथील रहिवाश्यांनी या बिबट्याचा बंदोबस्त



करावा अशी मागणी केली आहे. अमळनेर रस्त्यालगत असलेल्या नवीन वसाहत मध्ये या वसाहतींच्या एकीकडे वंजारी रस्ता, बाजूला बायपास महामार्ग उजवीकडे अंमळनेर रस्ता तर समोरून वसाहती अश्या चौरसात वसाहती निर्माण झाल्या आहेत. दरम्यान रात्रीचा काळोखात अशोक नगरात राहाणारे पिता पुत्र आपले काम आटपून घराकडे जात असताना त्यांची नजर बिबट्याकडे गेली. त्यांनी लागलीच वसाहतीतील रहिवाश्यांना डोळ्यापुढिल प्रसंग वसाहतधारकांना सांगून आपण जागृत राहावे असे वसाहत मध्ये आव्हान केले. दरम्यान रात्रीच्या बारा ते एक वाजेच्या सुमारास बायपास लगत असलेल्या विमल सिटी परिसरात दुसऱ्या दिवशी पुन्हा बिबट्याने संचार केल्यामुळे वसाहत धारकां मध्ये एकच घबराट निर्माण झाली आहे. दरम्यान रात्र असल्यामुळे परिसरातील म्हशींनी ओरडा ओरड केली होती. यावेळी सकाळी १८ रोजी या नवीन वसाहतीमध्ये

पान २ वर »

# मयत अक्षयच्या कुटुंबियांना एक लाखांची मदत



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** वृत्तसंस्था

येथील प्रबुद्ध कॉलनीतील रहिवासी असलेला आणि मुंबईत पोलीस भरती दरम्यान मयत झालेल्या अक्षय बिऱ्हाडेच्या कुटुंबियांना मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी वैयक्तिक १ लाखांची मदत देऊन आधार देण्याचा प्रयत्न केला आहे.

अक्षयच्या परिवाराची मंत्री ना. अनिल पाटील यांनी त्याच्या राहत्या घरी सांत्वनपर भेट दिली. सर्व परिस्थितीची माहिती घेऊन झालेला प्रकार अतिशय दुःखद असल्याचे सांगून मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. याबाबत तहसीलदारांना सूचनाही केल्या असून प्रस्ताव शासन दरबारी पोहोचल्यावर लवकरात लवकर योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. तसेच उपचारात हलगर्जीपणाची तक्रार असल्याने कळवा येथील हॉस्पिटल ची चौकशीही होणार असल्याचेही मंत्र्यांनी सांगितले आहे. दरम्यान बिऱ्हाडे कुटुंबातील एकुलता एक मुलगा गेल्याने कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती पाहता शासनाची मदत पुढे मिळेलच मात्र आता स्वतः त्यांच्याकडून मयताच्या परिवारास १०००००/-(एक लाख रुपये) आर्थिक मदत देण्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्यानुसार समाज बांधवांच्या उपस्थितीत १ लाख मदतीची रक्कम मयत अक्षय च्या वडिलांकडे सुपूर्द करण्यात आली. यावेळी ॲड. एस. एस. ब्रम्हे, सोमचंद संदानशिव, भानुदास कांबळे, दत्ता संदानशिव, दिनेश बिऱ्हाडे, सिद्धार्थ सोनवणे, गोकुळ बिऱ्हाडे, हृदयनाथ मोरे, तुषार संदानशिव, समाधान मैराळे, जितेंद्र हगवणे, विक्की पानसे तसेच प्रबुद्ध कॉलनीतील रहिवाशी समाजबांधव आणि पोलीस भरतीतील मित्र परिवार उपस्थित होता. सदर योगदानाबद्दल समाजबांधवांनी मंत्री पाटील यांचे आभार व्यक्त केले.

# आज राज्यातील ४१ शाळांना मिळणार विशेष पुरस्कार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील गांधी रिसर्च फाऊंडेशन आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगितेचा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण सोहळा शनिवार दि. २० जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष व ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिकचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त व गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुदर्शन आयंगार व गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त तथा जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.चे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. जळगाव शहरातील शिक्षक, पालक व स्वच्छताप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने करण्यात आले आहे. जैन हिल्सवरील गांधी तीर्थाच्या कस्तुरबा सभागृहात दुपारी ३ वाजता हा सोहळा होणार आहे. या स्पर्धेत राज्यस्तरावरील प्रथम पुरस्कारप्राप्त शाळेस रु. एक लाखाचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारप्राप्त शाळेस रु. एकावन्न हजार, एकतीस हजार व एकवीस हजार रोख व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच अंतिम मूल्यांकनासाठी पात्र ठरलेल्या शाळांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# ...अन् ९२ वर्ष जुनी परंपरा मोदी सरकारने केली खंडीत !

## एकत्र अर्थसंकल्प सादर करण्यावर भर : रेल्वे अर्थसंकल्पाला तिलांजली

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

२०१६-२०१७ या आर्थिक वर्षापर्यंत रेल्वे अर्थसंकल्प आणि सर्वसाधारण अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर केला जात होता. अर्थमंत्री अरुण जेटली यांनी २०१७-१८ या आर्थिक वर्षात पहिल्यांदाच रेल्वे अर्थसंकल्प आणि सर्वसाधारण अर्थसंकल्प एकत्र सादर करून ९२ वर्षे जुनी प्रथा संपवली. यापूर्वी संसदेत दोन अर्थसंकल्प सादर करण्यात आले होते, एक 'रेल्वे बजेट' आणि दुसरा 'सामान्य अर्थसंकल्प' मात्र भारत सरकारने दि. २१ सप्टेंबर २०१६ रोजी रेल्वे बजेटचे सर्वसाधारण अर्थसंकल्पात विलीनीकरण करण्यास मान्यता दिली; त्यावेळी अर्थमंत्री अरुण जेटली होते. दि. १ फेब्रुवारी २०१७ रोजी भारताचा पहिला संयुक्त अर्थसंकल्प संसदेत सादर केला. रेल्वेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पाची प्रथा सन १९२४ मध्ये सुरू झाली. ॲकवर्थ कमिटीच्या शिफारशींच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला होता, परंतु २०१७ पासून सामान्य अर्थसंकल्पासोबतच रेल्वे अर्थसंकल्प सादर केला जाऊ लागला. १९२१ मध्ये, ईस्ट इंडिया रेल्वे कमिटीचे अध्यक्ष सर विल्यम ॲकवर्थ यांनी रेल्वेमध्ये उत्तम व्यवस्थापन प्रणाली आणली.



यानंतर, त्यांनी १९२४ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पापासून वेगळे मांडण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून २०१६ पर्यंत तो स्वतंत्रपणे मांडला जात राहिला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, पहिला रेल्वे अर्थसंकल्प १९४७ मध्ये देशाचे पहिले रेल्वे मंत्री जॉन मथाई यांनी सादर केला. मथाई यांनी भारताचे अर्थमंत्री म्हणून दोन सर्वसाधारण अर्थसंकल्पही सादर केले होते. २०१६ मध्ये

पान २ वर »

### ...तेव्हा रेल्वेचे उत्पन्न होते जास्त

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला तेव्हाही रेल्वेकडून मिळणारा महसूल सामान्य महसूल प्राप्तीपेक्षा ६ टक्क्यांनी अधिक होता. सर गोपालस्वामी अय्यंगार समितीने वेगळ्या रेल्वे अर्थसंकल्पाची ही परंपरा सुरू ठेवण्याची शिफारस केली होती. २१ डिसेंबर १९४९ रोजी संविधान सभेने यासंबंधीचा ठराव मंजूर केला. विशेष म्हणजे या मंजुरीनुसार रेल्वे अर्थसंकल्प १९५०-५१ ते पुढील पाच वर्षांसाठीच स्वतंत्रपणे मांडायचा होता मात्र, ही परंपरा २०१६पर्यंत कायम राहिली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर रेल्वेचा महसूल हळूहळू कमी होऊ लागला आणि ७० च्या दशकात रेल्वे अर्थसंकल्प हा एकूण महसुली उत्पन्नाच्या केवळ ३० टक्के राहिला आणि २०१५-१६ मध्ये रेल्वेचा महसूल एकूण महसुलाच्या ११.५ टक्क्यांवर पोहोचला. तज्ज्ञांनी वेगळे रेल्वे बजेट रद्द करण्याची सूचना केली होती. यानंतर सरकारने रेल्वे अर्थसंकल्प आणि सामान्य अर्थसंकल्प एकत्र केले.

# मातंग समाजासाठी शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

राज्यातील मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेच्या धर्तीवर मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था( आर्टी) कंपनी नोंदणी कायदा २०१३ अंतर्गत नियम ८ नुसार स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या बाबतचा सामाजिक न्याय विभागाचा दिनांक १६ जुलै २०२४ शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. शासनाने सन २००३ मध्ये क्रांतीगुरू लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग गठीत केला होता. या आयोगाने शासनास ८२ शिफारशी केलेल्या असून ७२ क्रमांकावर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने मुंबई येथे राष्ट्रीय स्मारक उभे करून त्यात संशोधन व ज्ञानार्जन यांच्या अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी शिफारस केलेली होती. तसेच सन २०२४-२५ च्या आंतरिम अर्थसंकल्पामध्ये बार्टी च्या धरतीवर मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी)स्थापन करण्यात येणार आहे अशी घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक ११ जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जाती अंतर्गत मातंग व तत्सम जाती (मांग, मातंग, मिनीमादीग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग- गारोडी, मांग-गारूडी, मादगी, मादिगा) या समाजाच्या विकासाकरिता आर्टी संस्था स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संस्थेकरीता व्यवस्थापकीय संचालक व निबंधक अशा दोन पदांना देखील मान्यता देण्यात आली आहे. सदर संस्थेअंतर्गत संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, योजना विभाग, विस्तार व सेवा विभाग, लेखा विभाग आस्थापना विभाग हे कार्यरत असतील. या

पान २ वर »

जळगांव 0257 - 2237491, 9422775011, 8999256713 | ठाणे -मुंबई - 9422284511 | नाशिक-9890525925 | पुणे - 9209832828 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com

पान ५ वरून

## कोळंबे विद्यामंदिराच...

तसेच भजने गाऊन भक्तिमय वातावरणात हा दिंडी सोहळा संपन्न केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मोतीलाल जोगी, उपशिक्षिका प्रीती कुलकर्णी, सचिन वराडे, आशा कोळी, वंदना भालशंकर, अनिल चौधरी, चित्रा भारंबे आदींनी परिश्रम घेतले.

## राज्याच्या पर्यटन धोरणातून...

संप्रेषण तंत्रज्ञान सक्षमीकरणासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), दुर्मिळ कला, संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करण्यास प्रोत्साहन ( प्रति रु. ५ लाख पर्यंत), नाविन्यपूर्ण उत्पादने/सेवांसाठी प्रोत्साहन (प्रति रु, ५० हजार पर्यंत), दिव्यांगाना रोजगार देण्यासाठी प्रोत्साहन, पर्यावरण पर्यटन प्रमाणपत्रासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), कृषी, कॅराव्हॅन, साहसी पर्यटनासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे, याबाबतचा सविस्तर शासन निर्णय राज्यशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असेही मंत्री श्री. महाजन यांनी म्हटले आहे.

## पक्षीमित्राने चष्मेवाल्याची...

पाहील्याने एक छोटासा पक्षी असल्याचे लक्षात येऊन त्याच्या गळ्या भोवती केसांचा फास असल्याने तो मृत अवस्थात आहे की काय असे त्यांना वाटले. दरम्यान त्याला स्पर्श करताच त्याच्या हलचाली सुरू झाल्याने त्याचे निरिक्षण केल्यानंतर तो चष्मेवाला (ओरिएटल व्हाईट आय) असल्याचे लक्षात आले. त्याला हळुवार हातात घेऊन त्याच्या गळ्या भोवतालचा केसाचा गुंता काढण्याचा प्रयत्न केला. छोटासा जिव असल्या कारणाने त्याला कोणत्याही इंजा न होता त्याची सुखरूप सुटका करण्यासाठी फुलपाखरू अभ्यासक सौरभ महाजन व चातक निर्सग संवर्धनाचे सदस्यांना याची माहिति देत यांना बोलवून घेत या छोट्याशा पक्षाची कशी सुटका होईल याचे प्रयत्न सुरू केले. चष्मेवाल्याच्या अंगावरची पिसाचा रंग यात केसाला रंगात साम्य असल्याने गळया भोवतालचे केस बाजूला काढणे अवघड होत होते. मात्र महाजन यांचा मुलगा सौरव याने मोठ्या चातुर्याने छोट्याश्या पक्षाच्या गळ्या भोवताल केस कात्रीने कापुन लागलेला फास मोकळा केला. नंतर त्याला पाणी पाजुन त्याच्या डोक्यावरुन हात फिरवीला. त्याला पाणी गिळण्यासाठी त्रास होत असल्याने त्याच्या गळ्यावर हातने फिरवून निसर्गाच्या भ्रमंतीसाठी सज्ज केले. अशा प्रकारे चष्मीवाला ( ओरीएटल व्हाईटआय ) या पंक्षाची सुखरूप सुटका केली.

## सकल मुस्लिम...

सर (महाराष्ट्र अल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष शरद पवार गट) शकील मेम्बर, अहमद ठेकेदार, राष्ट्रवादी कार्यकर्ते रउफ खान, मुख्तार खान, आसीफ भाई पानी वाले, मुश्ताक मनियार, जाकीर शब्बीर राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, इरफान बागवान मुस्लिम मोर्चा आदि समाज बांधव उपस्थित होते.

## सावदा प्राथमिक...

वाटप केल्या, त्याचप्रमाणे शाळेतर्फे दिंडी मार्गातील मोठा आड परिसरात सहभागी सर्व बालगोपालांना राजगिरा लाडू, केळी, वेफर्स चे वाटप केले. हा पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका उषा तायडे, शिक्षिका कल्पना इंगळे, गणेश सापकर, संदीप नेहेते, योगेश महाजन, सुलोचना लोखंडे, कल्पेश शिवदे, मंजुषा चौधरी, अमोल भारंबे, दीपक खाचणे, राहुल सरोदे, वैशाली पदमे, ओजस होले, सुनील लोखंडे या शिक्षकांचे सहकार्य लाभले.

## लाडकी बहिण योजनेच्या...

माजी गटनेते डॉ. प्रशांत भोंडे, माजी नगरसेवक आतिश झाल्टे, स्वीय सहाय्यक दिपक तायडे, माधव चव्हाण, शहराध्यक्ष रविंद्र झाल्टे, कैलास पालवे, विजय शिरसाठ, अजय पाटील तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत मुक्ताबाई महाविद्यालयात...

कडुनिंब, अरेका पाम, ड्रेसिना इत्यादी पर्यावरणास फायदेशीर अशा वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण अबाधित ठेवण्यासाठी वृक्षसंवर्धनासाठी महाविद्यालयाने स्तुत्य पुढाकार घेतल्याने त्यांचे कौतुक यावेळी विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष तथा अमरावतीचे माजी आमदार माननीय रावसाहेबदादा शेखावत यांनी केले. वृक्षारोपण कार्यक्रमासाठी वृक्षारोपण लागवड व संवर्धन समितीचे संयोजक जगदीश सिसोदिया यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास संत मुक्ताबाई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एन डी काटे, संत मुक्ताबाई इंग्लिश मिडीयम च्या प्राचार्या मती प्रियंका पवार, महाविद्यालयातील क्रीडा समन्वयक डॉ जे बी सिसोदिया, विद्यार्थी विकास अधिकारी रमेश शेवाळे, प्रा डॉ अजित कुलकर्णी, संदीप माळी, शारीरिक शिक्षण संचालक डॉ वीरेंद्र जाधव, प्रा डॉ के पी पाटील, अशोक पाटील, रवि पाटील, किशोर कोळी, निलेश इंगळे, प्रकाश पाटील, जनार्दन आमोदकर इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आय डी पाटील यांच्या मार्गदर्शनातून संपन्न झाला.

## राखेचे ट्रॅक्टर उलटल्याने...

हा सुमारे १५ ते १८ वर्षाचा तरुण दि १७ बुधवार रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान ट्रक्टर घेऊन राख भरण्यासाठी जात होता. अचानक टॅक्ट्ररसह ट्रॉली उलटल्याने विशाल त्याखाली दाबला गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. या बाबत वरणगाव पोलीस स्टेशनला बी एन एन एस १९४ प्रमाणे अकस्मत मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेचा पुढील सह पो निरिक्षक श्रावण जवरे हे करीत आहे.

## आयुष्यात ध्येय ठरविल्याशिवाय...

ध्वजारोहण करण्यात आले तसेच शाळेचा वर्धापन दिनाचा लोगो फुग्यांचा सहाय्याने मान्यवरांच्या उपस्थितीत आकाशात सोडण्यात आला. अध्यक्षांचा परिचय देवयानी भावसार यांनी करून दिला. अहवाल वाचन आर. जे. पाटील यांनी केले. यावेळी एसएससी परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा तसेच क्रीडा क्षेत्रात प्रावीण्य संपादन केलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. मंगळग्रह सेवा संस्था तसेच इतर देणगीदार यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना दप्तर, गणवेश तसेच इतर शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ए. ए. पाटील यांनी केले. आभार एस. पी. वाघ यांनी मानले.

## विद्यार्थ्यांनीची वन विभागात...

रवींद्र पाटील होते या समयी संचालिका रूपाली पाटील, प्राचार्य श्रीनिवासराव, अजिम शेख, उपप्राचार्य कविता सूर्यवंशी ऍडमिनिस्टेड विश्वास पाटील, विभाग प्रमुख नम्रता बेडीसकर, वृषाली पाटील, क्लार्क श्रीकांत खैरनार, सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

## मातंग समाजासाठी...

संस्थेचे कामकाज सद्यस्थितीत भाड्याच्या इमारतीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. चिरागनगर, घाटकोपर, मुंबई येथील अण्णा भाऊ साठे यांचे राष्ट्रीय स्मारक पूर्ण झाल्यानंतर स्मारकाच्या इमारतीतून संस्थेचे कामकाज चालेल. तसेच संस्थेला आवश्यक मनुष्यबळ हे सेवा करार पद्धतीने बाह्य यंत्रणेद्वारे तसेच अतिरिक्त पदभार देऊन उपलब्ध करून घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे. या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, उच्चशिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, रोजगार व रोजगार प्रशिक्षण, स्टार्टअप, रोजगार निर्मिती, प्रचार, प्रसिद्धी, प्रसार, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकास करण्यासाठी व त्यांच्याशी निगडित विविध योजना राबविण्यात येणार आहे तसेच परंपरागत व्यवसायांना चालना देणे आर्थिक मदत करणे हे देखील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले आहेत.

## ...अन् ९२ वर्ष जुनी ...

रेल्वेमंत्री असलेले पीयूष गोयल यांनी अखेरचा रेल्वे अर्थसंकल्प सादर केला. नोव्हेंबर २०१६ मध्ये, रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले की, केंद्र सरकार रेल्वे बजेट केंद्रीय बजेटमध्ये विलीन करेल. निती आयोगाचे सदस्य बिबेक देबरॉय यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशींवर आणि देबरॉय आणि किशोर देसाई यांनी 'रेल्वे बजेटसह वितरण' या स्वतंत्र पेपरवर आधारित हा निर्णय घेतला. यानुसार वित्त मंत्रालय रेल्वेसाठी अंदाजपत्रकासह विनियोग विधेयक तयार करेल आणि ते संसदेत सादर करेल, असा निर्णय घेण्यात आला. यासंबंधीचे सर्व विधिमंडळाचे कामही अर्थ मंत्रालय हाताळेल. भारतीय रेल्वेला सरकारला लाभांश देण्यापासून सूट दिली जाईल त्यामुळे रेल्वेचा भांडवली प्रवाह संपणार आहे. त्याऐवजी, भांडवली खर्चाचा हिस्सा भरण्यासाठी रेल्वे मंत्रालयाला वित्त मंत्रालयाकडून एकूण अर्थसंकल्पीय सहाय्य दिले जाईल. पुढे असे ठरविण्यात आले की भारतीय रेल्वे आपल्या भांडवली खर्चासाठी अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनांद्वारे बाजारातून संसाधने उभारत राहील.

## पारोळ्यात नविन वसाहतीत...

बिबट्याच्या संचाराची घटना वाऱ्यासारखी पसरली. दिनांक १८ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी शामकांत देसले यांनी आपल्या सहकाऱ्यांसह याभागात भेट देत पाहाणी केली असता रात्रीच्या वेळी बिबट्याच्या संचार झाल्याचे सांगितले. अशोक नगर विमल सिटी या भागात बिबट्याने संचार केल्यामुळे नागरिकांच्या मनात मोठी भिती निर्माण झाली आहे. वनविभाग रात्रीच्या वेळी नाईट पेट्रोलिंग करून बिबट्या कडे लक्ष केंद्रित करणार असुन वसाहत धारकांनी दक्ष राहून बिबट्याचा संचार होणार नाही यासाठी फटाके फोडावेत व बिबट्या आढळल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा व माहिती द्यावी असे आवाहन केले आहे.


**भारत सरकार,**
**रेल्वे मंत्रालय, रेल्वे भर्ती सेल,**
**केंद्रीय रेल्वे**
CPM रूपांतरण कार्यालय इमारत., P.D'Mello रोड, वाडीबंदर, मुंबई – ४०० ०१०.

**सूचक सूचना**
रोजगार सूचना क्रमांक RRC/CR/01/2024
दिनांक २०.०७.२०२४

मध्य रेल्वेने २०२४–२०२५ या वर्षासाठी विविध विषयांतर्गत क्रीडा कोट्यातील गट आणि ४१ (पूर्वीच्या गट ) मधील २१ पदे भरण्यासाठी पात्र क्रीडा व्यक्तींकडून ऑनलाइन अर्ज मागवले आहेत.

| स्तर / ग्रेड पे | पदांची संख्या |
|---|---|
| स्तर ५/४ GP (रु. २८००/ रु. २४००) | ०५ |
| स्तर ३/२ GP (रु. २०००/रु. १९००) | १६ |
| स्तर १ GP (रु. १८००) | ४१ |
| एकूण | ६२ |

ऑनलाइन अर्ज उघडण्याची तारीख आणि वेळ: २२.०७.२०२४ सकाळी १०.०० वाजता. ऑनलाइन अर्ज करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: २१.०८.२०२४ रोजी १८.०० वाजता. तपशीलवार सूचनांसाठी कृपया RRC/CR च्या www.rrccr.com वेबसाइटला भेट द्या, जी २२.०७.२०२४ पासून उपलब्ध होईल
AK-265
धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.


**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विकास**
**ग्रामपंचायत रिंगणगांव ता.एरंडोल जिल्हा जळगाव**
**ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२४-२५**
**सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत रिंगणगांव ता. एरंडोल जिल्हा जळगाव यांजकडून जळगाव जिल्हा परिषदे कडील नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून दोन लिफाफा पद्धतीने पुढील कामांची ई - निविदा मागवीत आहे.**

| अ.क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | Providing L.E.D. Street Light on Existing Pole | ५६६७१७/- | जिल्हापरिषद जळगाव यांचेकडील नोंदणीकृत कंत्राटदार | 30 दिवस |

ईच्छुक निविदाधारकांनि निविदेच्या अटी व शर्ती संदर्भात https://mahatenders.gov.in/nicgep/app या वेबसाईटवर तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे संपर्क साधावा.

/-
सरपंच / ग्रामसेवक
ग्रामपंचायत रिंगणगांव ता. एरंडोल जि. जळगांव

# THE MODERN CO-OP BANK LTD., CHALISGAON

**THE MODERN CO-OP BANK LTD., CHALISGAON**
**Balance Sheet as on Date- 31 March 2024**

| | SCHEDULE | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|---|
| Capital | 1 | 4104444 | 3823278 |
| Reserve And Surplus | 2 | 11749019.71 | 10491311.56 |
| Deposits | 3 | 87887816.11 | 89761933.82 |
| Borrowings | 4 | 0 | 0 |
| Other Liabilities And Provisions | 5 | 5631471.93 | 5523765.51 |
| Total(Liabilities) | | 109372751.8 | 109600288.9 |
| Assets | | 0 | 0 |
| Cash And Balances With Rbi | 6 | 18873196.5 | 16474539.31 |
| Balance With Banks &Money At Call & Short Notice | 7 | 0 | 0 |
| Investments | 8 | 22815000 | 32830119 |
| Advances | 9 | 60667825.95 | 53400852.45 |
| Fixed Assets | 10 | 3633404 | 3633404 |
| Other Assets | 11 | 3724485.61 | 3743409.4 |
| Contingent Liabilities | 12 | 72229 | 0 |
| Total(Assets) | | 109713912.1 | 110082324.2 |
| Bill For Collection | | 0 | 0 |
| Significant Accounting Policies | | 0 | 0 |
| Notes To Accounts | | 0 | 0 |

| SCHEDULE 1-CAPITAL | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Capital | 4104444 | 3823278 |
| I. For Nationalised Banks | 0 | 0 |
| Capital (Fully Owned By Central Government) | 0 | 0 |
| II. For Banks Incorporated Outside India | 0 | 0 |
| Capital | 0 | 0 |
| (I) The Amount Brought In By Banks By Way Of Start-Up Capital | 0 | 0 |
| (II) Amount Of Deposit Kept With The Rbi Under Section 11(2) O | 0 | 0 |
| Total | 0 | 0 |
| III. For Other Banks | 4104444 | 3823278 |
| AUTHORISED CAPITAL 0 EQUITY SHARES OF RS.0/-EACH | 0 | 0 |
| Regular Share | 0 | 0 |
| Associate Share | 0 | 0 |
| Issued & Subscribed(Paidup Capital) | 4104444 | 3823278 |

| SCHEDULE 2-RESERVE AND SURPLUS | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Reserve And Surplus | 11749019.71 | 10491311.56 |
| I.Statutory Reserve | 1904758.63 | 1100725.63 |
| Opening Balance | 1100725.63 | 971260.63 |
| Addition During The Year | 804033 | 129465 |
| Deductions During The Year | 0 | 0 |
| II.Capital Reserve | 0 | 0 |
| Opening Balance | 0 | 0 |
| Addition During The Year | 0 | 0 |
| Deduction During The Year | 0 | 0 |
| III. Share Premium | 0 | 0 |
| Opening Balance | 0 | 0 |
| Addition During The Year | 0 | 0 |
| Deduction During The Year | 0 | 0 |
| IV. Revenue And Other Services | 9844261.08 | 9390585.93 |
| Opening Balance | 9390585.93 | 9079322.63 |
| Addition During The Year | 753949.15 | 326163.3 |
| Deduction During The Year | 300274 | 14900 |
| V. Balance In Profir &Loss Account | 0 | 0 |
| Total(I,II,III,IV And V) | 11749019.71 | 10491311.56 |

| SCHEDULE 3-DEPOSITS | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Deposits | 87887816.11 | 89761933.82 |
| A.I.Demand Deposits | 4964066.19 | 8297093.45 |
| A.I) From Banks | 0 | 0 |
| A. II) From Others | 4964066.19 | 8297093.45 |
| II) Saving Bank Deposits | 24412278.97 | 29423264.42 |
| III) Term Deposits | 58511470.95 | 52041575.95 |
| I) From Banks | 0 | 0 |
| II) From Others | 30121801 | 23230117 |
| Total(I,II & III) | 87887816.11 | 89761933.82 |
| B.I) Deposits Of Branches In India | 87887816.11 | 89761933.82 |
| II) Deposits Of Branches Outside India | 0 | 0 |
| Total | 87887816.11 | 89761933.82 |

| SCHEDULE 5-OTHER LIABILITIES AND PROVISIONS | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Other Liabilities And Provisions | 5631471.93 | 5523765.51 |
| I.Bills Payable | 0 | 0 |
| II. Inter-Office Adjustments(Net) | 0 | 0 |
| III. Interest Accrued | 0 | 0 |
| IV. Others (Including Provisions): | 5631471.93 | 5523765.51 |
| Total | 5631471.93 | 5523765.51 |

| SCHEDULE 6-CASH AND BALANCES WITH RBI | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Cash And Balances With Rbi | 18873196.5 | 16474539.31 |
| I.Cash In Hand (Including Foreign Currency Notes) | 1803396 | 337270 |
| II.Balances With Reserve Bank Of India | 0 | 0 |
| I) In Current Accounts | 14995370.5 | 15770586.31 |
| II) In Other Accounts | 2074430 | 366683 |
| Total (I&II) | 18873196.5 | 16474539.31 |

| SCHEDULE 8-INVESTMENT | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Investments | 22815000 | 32830119 |
| I.Investments In India | | |
| A) Govt.Securities (Includin T.Bils) | 22800000 | 32815119 |
| B) Other Approved Securities | 0 | 0 |
| C) Shares | 15000 | 15000 |
| D)Debentures And Bonds | 0 | 0 |
| E)Subsidiaries And /Or Joint Ventures | 0 | 0 |
| F)Others | | |
| Total(Investments In India) | 22815000 | 32830119 |
| II) Investment Outside India | 0 | 0 |
| I)Government Securities (Including Local Authorities) | 0 | 0 |
| II)Subsidiaries And/Or Joint Ventures Abroad | 0 | 0 |
| II)Other Investments(To Be Specified) | 0 | 0 |
| Total | 0 | 0 |
| Grand Total (I&II) | 22815000 | 32830119 |

| SCHEDULE 9-ADVANCES | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Advances | 60667825.95 | 53400852.45 |
| A. | 0 | 0 |
| I)Bills Purchased And Discounted | 0 | 0 |
| II)Cash Credits, Overdrafts & Loans Repayable On Demand | 23572244.36 | 21125373.45 |
| III)Term Loans | 37095581.59 | 32275479 |
| Total | 60667825.95 | 53400852.45 |
| B. | 0 | 0 |
| I)Secured By Tangible Assets (Includes Advances Against Book Deb | 56994900.95 | 43633306.36 |
| II) Covered By Bank /Government Guarantees | 0 | 0 |
| III) Unsecured | 3672925 | 9767546.09 |
| Total | 60667825.95 | 53400852.45 |
| C. I.Advances In India | 0 | 0 |
| I) Priority Sector | 36058703.95 | 29957305.45 |
| II) Public Sector | 0 | 0 |
| III) Banks | 0 | 0 |
| IV) Others | 24609122 | 23443547 |
| Total(C.I) | 60667825.95 | 53400852.45 |
| II. Advances Outside India | 0 | 0 |
| I)Due From Banks | 0 | 0 |
| II)Due From Others | 0 | 0 |
| A)Bills Purchased And Discounted | | |
| B)Syndicated Loans | | |
| Total(C I And II) | 60667825.95 | 53400852.45 |

| SCHEDULE 10-FIXED ASSETS | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Fixed Assets | 3633404 | 3633404 |
| I Premises | 3633404 | 3633404 |
| I)At Cost As On 31st March Of The Preceding Year | 3633404 | 3626404 |
| 2)Addition During The Period | 0 | 7000 |
| 3) Deduction During The Period | 0 | 0 |
| 4)Depreciation To Date | 0 | 0 |
| II) Other Fixed Assets (Including Furniture And Fixtures) | 0 | 0 |
| 1) At Cost As On 31st March Of The Preceding Year | 0 | 0 |
| 2) Addition During The Period | 0 | 0 |
| 3) Deduction During The Period | 0 | 0 |
| 4) Depreciation To Date | 0 | 0 |
| Total(I And II) | 3633404 | 3633404 |

| SCHEDULE 11-OTHER ASSETS | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Other Assets | 3724485.61 | 3743409.4 |
| I)Inter-Office Adjustments (Net) | 0 | 0 |
| II)Interest Accrued | 0 | 0 |
| III)Tax Paid In Advance/Tax Deducted At Source | 0 | 0 |
| IV)Stationery And Stamps | 0 | 0 |
| V)Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims | 0 | 0 |
| VI)Others | 3724485.61 | 3743409.4 |
| Total (I,II,III,IV,V,VI) | 3724485.61 | 3743409.4 |

| SCHEDULE 12-CONTINGENT LIABILITIES | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Contingent Liabilities | 72229 | 0 |
| I)Claims Against The Bank Not Acknowledged As Debts | 0 | 0 |
| II) Liability For Partly Paid Investments | 0 | 0 |
| III)Liability On Account Of Outstanding Forward Exchange Contracts | 0 | 0 |
| IV)Guarantees Given On Behalf Of Constituents | 15000 | 0 |
| A)In India | 15000 | 0 |
| B) Outside India | 0 | 0 |
| V)Acceptance ,Endorsements And Obligations | 0 | 0 |
| VI)Other Items For Which Bank Is Contigent Liable | 57229 | 0 |
| Total(I,II,III,IV,V,VI) | 72229 | 0 |

**THE MODERN CO-OP BANK LTD., CHALISGAON**
**Profit & Loss as on Date- 31 March 2024**

| | SCHEDULE | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|---|
| Income | | 7239928.38 | 6485355.92 |
| Interest earned | 13 | 6932328.11 | 5540911 |
| Other Income | 14 | 307600.27 | 944444.92 |
| Total(Group Income) | | 7239928.38 | 6485355.92 |
| II.Expenditure | | 6898866.07 | 6003418.65 |
| Interest Expended | 15 | 3431261 | 3210591 |
| Operating Expenses | 16 | 3467605.07 | 2792827.65 |
| Provisions and Contingencies | | 0 | 0 |
| Total( Expenditures) | | 6898866.07 | 6003418.65 |
| III.Profit and Loss | | 0 | 0 |
| Net profit/loss(-) for the year | | 341062.31 | 481937.27 |
| Profit/Loss(-) brough forward | | 0 | 0 |
| Total(GROUP III) | | 341062.31 | 481937.27 |
| IV.Appropriations | | 0 | 0 |
| Transfer to statutory reserves | | 0 | 0 |
| Transfer to other reserves | | 0 | 0 |
| Transfer to Government/propsed dividend | | 0 | 0 |
| Balance carried over to Balance sheet | | 0 | 0 |

| SCHEDULE 13-INTEREST EARNED | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Interest earned | 6932328.11 | 5540911 |
| I.Interest/Discount on advances/ bills | 5569711 | 3835727 |
| II.Income on investments | 1362617.11 | 1705184 |
| III.Interest on balances with RBI and other inter-bank funds | 0 | 0 |
| IV.Others | 0 | 0 |
| V.Total | 6932328.11 | 5540911 |

| SCHEDULE 14-OTHER INCOME | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Other Income | 307600.27 | 944444.92 |
| I.Commission,exchange and brokerage | 137574.78 | 140578.36 |
| II.Profit on sale investments | 0 | 0 |
| Less:Loss on sale investments | 0 | 0 |
| III.Profit on revaluation of investments | 0 | 0 |
| Less:Loss on revaluation of investments | 0 | 0 |
| IV.Profit on sale of land,building and other assets | 0 | 0 |
| Less:Loss on sale of lands,buildings and other assets | 0 | 0 |
| V.Profit of exchange transactions | 0 | 0 |
| Less:Loss on exchange of transactions | 0 | 0 |
| VI.Income earned by way of dividend/subsidiaries/companies and/or joint ventures abroad/in India | 0 | 0 |
| VII.Miscellaneous Income | 170025.49 | 803866.56 |
| Total | 307600.27 | 944444.92 |

| SCHEDULE 15-INTEREST EXPENDED | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Interest Expended | 3431261 | 3210591 |
| I.Interest on deposits | 3431261 | 3210591 |
| II.Interest on Reserve Bank of India/Inter bank borrowings | 0 | 0 |
| III.Others | 0 | 0 |
| Total | 3431261 | 3210591 |

| SCHEDULE 16-OPERATING EXPENSES | AS ON 31/03/2024 | AS ON 31/03/2023 |
|---|---|---|
| Operating Expenses | 3467605.07 | 2792827.65 |
| I.Payments to and provisions for employees | 907286 | 989375 |
| II.Rent, taxes and lighting | 213049.58 | 213041.16 |
| III.Printing and Stationary | 60562.01 | 52746.05 |
| IV.Advertisements and Publicity | 0 | 0 |
| V.Depreciation at bank's property | 921176 | 294190 |
| VI.Director fees,allowances and expenses | 59000 | 46400 |
| VII.Auditor's fees and expenses(including branch auditors) | 150000 | 0 |
| VIII.Law Charges | 6000 | 54000 |
| IX.Postages,TelegramsTelephones etc | 40767 | 48398 |
| X.Repairs and maintenance | 0 | 0 |
| XI.Insurance | 0 | 0 |
| XII.Other Expenditure | 1109764.48 | 1094677.44 |
| Total | 3467605.07 | 2792827.65 |

## लेखा परिक्षकाचा अहवाल

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५–ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा,**

मी दि मॉडर्न को. ऑप बँक मर्यादित चाळीसगांव. नोंदणी क. जेजीए/सीएचएल/बीएनके/१११/०/९९ या बँकेची सन २०२३–२४, या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण केलेले आहे. या सोबत बँकेचा ३१ मार्च २०२३ या दिनांका चा ताळेबंद व सन २०२३–२४ या सहकारी वर्षाचे नफा–तोटा पत्रक सोबत जोडलेले आहे. सदरच्या आर्थिक पत्रकांची जबाबदारी ही बँकेच्या व्यवस्थापनाची आहे. माझी जबाबदारी ही वैधानिक लेखापरिक्षणाच्या आधारे सदरच्या आर्थिक पत्रकांबद्दल मत व्यक्त करण्याची आहे. लेखापरिक्षण हे भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत असलेल्या लेखापरिक्षणाच्या प्रमाणकांवर आधारीत करण्यात आलेले आहे. लेखापरिक्षणाची प्रमाणके असे सांगतात कि, नियोजन आणि लेखापरिक्षण अशा प्रकार करण्यात यावे कि, आर्थिक पत्रके ही गंभीर दोषांपासुन मुक्त आहेत याबाबत योग्य खात्री करता येईल. आर्थिक पत्रकामध्ये असलेल्या रकमा आणि दर्शविलेल बाबींचा नमुना पध्दतीने तपासणे याचा लेखापरिक्षणामध्ये समावेश होतो. जमाखर्चा साठी उपयोगात आणलेली तत् व बँकेच्या व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अनुगान आणि त्याबरोबरच आर्थिक पत्रकांचे केलेले सादरीकरण या बाबींचा निर्धारण करण्याचा समावेश लेखापरिक्षणामध्ये होतो. माझा संपुर्ण विश्वास आहे कि, मी केलेले लेखापरिक्षण माझे मत व्यक्त करण्यासाठी योग्य आधार पुरवितात. वर उल्लेख केलेल्या लेखापरिक्षणाच्या पध्दतीनुसार आणि सामान्य शेरे व सुचनांच्या अधिन राहून अहवाल करतो की,

१. माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब झाले आहेत.

२. माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाश्याच्या आधारे, अ) ताळेबंद व नफा–तोटा पत्रक बँकेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळत असुन सदर ३१ मार्च २०२४ या दिनांकाचा ताळेबंद बँकेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शविते आणि नफा– तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शविते

ब) बँकेचे हिशोब हे त्यावरील टिपणीस पात्र राहुन महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायदानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३. माझ्या मते बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, नियम व बँकेचे पोटनियम या नुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तकेयोग्य रितीने ठेवलेली आहेत.

४. सन २०२३ २४ या सहकारी वर्षासाठी बँकेस लेखापरिक्षण वर्ग ब देण्यात आला आहे. सामान्य शेरे भाग अ, ब व क ला अनुसरुन.

दिनांक : ०७/०६/२०२४
गांव : नाशिक

BKSK AND ASSOCIATES CHARTERED ACCOUNTANTS FRN 114816W

सही/–
जीवन बन्सीलाल बेदमुथा
सनदी लेखापाल

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर**
दुरध्वनी क्रमांक ०२५८७-२२४११२
**e-mail: amalner.ce@mahapwd.gov.in**

**ई–निविदा सुचना क्रमांक ०५ सन २०२४–२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर हे कुठलेही सक्षम कंत्राटदार जे निवीदेतील अटी व शर्ती पूर्ण करतील अशा कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब–१ नमुन्यातील निवीदा ई–निवीदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवीत आहेत. निवीदा कागदपत्रे महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ : **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. कोणतीही किंवा सर्व निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता, यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच अट असलेली कोणतीही निवीदा स्विकारली जाणार नाही.

वरील निविदा सुचनेत एकूण **१२ (बारा)** काम असून त्यात **रस्ते आणि पुल ची कामे समाविष्ठ** असून कामांच्या निविदांची संपूर्ण माहिती दिनांक **१९/०७/२०२४ ते २६/०७/२०२४** रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत डाऊन लोडींगसाठी : **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदरची विस्तृत निविदा सुचना : **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**अमळनेर**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.११३/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** शे.समद शे. बाबु खाटीक, रा. सिड फार्म मनियार मस्जित जवळ, मुक्ताईनगर
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.०५/०९/१९६९ रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.१२८/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** मुशीर खा मुनीर खां, रा. इस्लामपुरा सिड फार्म मुक्ताईनगर// विरुध्द//
मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.०१/१२/१९८५ रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.१२९/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** फिरोज खान मुनीर खान रा. इस्लामपुरा सिड फार्म मुक्ताईनगर
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.२१/०५/१९८० रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जिल्हा परिषद, लघुसिंचन विभाग, जळगांव**
**ई–निविदा सूचना क्रमांक ०१ / २०२४–२०२५**

म.अति. मुख्य कार्यकारी आधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे वतीने म. कार्यकारी अभियंता सिंचन विभाग, जिल्हा परिषद जळगांव हे कामांच्या बी–१ दोन लिफाफा पध्दतीने ई–निविदा पध्दतीच्या महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषदेकडे मजुर सोसायटी प्रवर्गातील मक्तेदार यांच्यासाठी जिल्हयातील विविध तालुक्यातील विकास कामांचा एकुण १३ कामांची ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

वरिल कामांची निविदा केवळ ई–निविदा (ऑनलाईन) पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या : **http://mahatenders.gov.in** या वेब साईटवर दिनांक १९/०७/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**ई–निविदा प्रसिध्दीचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| ऑनलाईन निविदा विक्री व स्विकृती दिनांक | दि. १९/०७/२०२४ ते दि.२६/०७/२०२४ | संध्या ६.०० पर्यत |
| ऑनलाईन निविदा उघडणे दिनांक | दि.२९/०७/२०२४ | दुपारी ४.०० पर्यत (शक्य झाल्यास) |

जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद (ल.पा.) जळगांव

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.डी.बी.बोरसे**

**जामनेर येथील २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर जामनेर जि. जळगांव**

**दि.कि.अर्ज क्र. १०२/२०२४** **निशाणी क्र. ७**
**चौकशी तारीख २१/०८/२०२४**
**अर्जदार :-** सरला रामचरण शर्मा, उ. व. ४६,धंदा मजूरी, रा. मारवाडी गल्ली, नेरी बु. ता. जामनेर जि. जळगांव
**//विरुध्द//**
कोणीही नाही **..... सा.वाला**
**अर्ज:- वारस दाखला मिळणेकरीता अर्ज**

या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की, [१]असे की, अर्जदार ही वर नमुद पत्यावरील कायमची रहिवासी असून ती वर नमुद पत्यावर राहते. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा मयत रामचरण काळुराम शर्मा व गुलाबदेवी रामचरण शर्मा यांची मुलगी व रामविलास रामचरण शर्मा यांची बहिण यांचे वारस आहेत. रामविलास रामचरण शर्मा हा अविवाहीत होता. या अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाही. [२]असे की अर्जदार हा मयत रामचरण काळुराम शर्मा हे दि. ३०/०१/१९९२ गुलाबदेवी रामचरण शर्मा हया दि. ०९/०१/१९९७ व रामविलास रामचरण शर्मा हा दि. १४/११/२०२३ रोजी नेरी बु. ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसांना त्यांचे मयताचे वारस म्हणून इतर शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी वारस दाखला संबंधी तलाठी साो / शासकीय कार्यालय, नेरी बु. ता. जामनेर यांचेकडे गेले असता त्यांनी मयताचा वारस दाखला आणण्यास सांगितले म्हणून सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे. [३] असे की, त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हया मयत रामचरण काळुराम शर्मा व गुलाबदेवी रामचरण शर्मा यांची मुलगी व रामविलास रामचरण शर्मा यांची बहिण असून ते त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतीरिक्त आणखी कोणी वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणण देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत मे. कोर्टात दि. २१/०८/२०२४ रोजी प्रत्यक्ष जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे.हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीरवारस असल्याबद्दलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **१५/०७/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**क.लिपीक**

**हुकुमावरुन**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**२ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,जामनेर**

---

**जाहिर नोटीस**

**यावल येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी साो.यांचे न्यायालयात**

**मृत्यू/जन्म अर्ज नं. १७३/२०२४**
**तारीख ३०/०५/२०२४**
**निशाणी नं. १७३/२०२४**
**अर्जदार :-** अफजलखान अलीयार खान, रा. रुम नं. १४६,१/५, सोशल नगर एम जी रोड, नुरुलहुदा मस्जीद जवळ धारावी, मुंबई
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी अधिकारी न. पा.यावल **..... सा.वाले**
**अर्ज - जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १३[३] प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत...**

याव्दारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १३ [३] प्रमाणे जन्माची नोंद होणे प्रमाणे, **अर्जदार यांनी स्वत: नामे अफजल खान अलीयार खान यांचा जन्म दाखला** मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.**अर्जदार यांनी स्वत: नामे वसीम इकबाल खान यांचा जन्म यावल ता. यावल येथे दि. ०१/०८/१९६७ रोजी** झालेला आहे.त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जाविरुध्द कोणी इसमास हरकत असल्यास **कारण दाखविण्याकरीता दि. ५/७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात व्यक्तीगत किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून जन्म नोंदणी दाखला देण्यात येईल.आज दिनांक **३०/०५/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**मोहनमाला नाझीरकर**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यावल**

---

**नमुना क्र. ७५**

जा.क्र.ACC-१/३२८५/२०२४
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय
जळगाव विभाग जळगाव
दिनांक १६/०७/२०२४

**चौकशी जाहिर नोटीस**
**नोंदणी चौकशी अर्ज क्र.५५१/२०२४**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.:-** सातपुडा निवासिनी श्री.मनुदेवी सेवा प्रतिष्ठान, आडगांव ता. यावल जि. जळगाव, नोंदणी क्र.ई-५५४/जळगांव
**अर्जदार -** श्री निळकंठ डिगंबर चौधरी

व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सहयक धर्मदाय आयुक्त-१ जळगांव विभाग, जळगांव हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१] उपरोक्त न्यासाच्या परिशिष्ठ १ वर खालील प्रमाणे स्थावर मिळकत नोंदविण्यासंबंधी सदरचा बदल अर्ज दाखल केला आहे.

**स्थावर मिळकत [वर्णन]** - [अ]मौजे आडगांव ता. यावल जि. जळगाव येथील ग्रामपंचायत घर नं. ५५९ क्षेत्रफळ १०५.८२ चौ.मी.अंदाजे किंमत ७.४०.७४०/- रुपये, चतु:सिमा - पुर्वेस जि. प. शाळा, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस मरीमाता मंदिर,दक्षिणेस रस्ता [ब] या मिळकतीवरील कार्यालयाचे इमारत तळ मजला क्षेत्रफळ ७६.४० चौ.मी. मुल्य ५.९०.१९० रुपये, पहिला मजला क्षेत्रफळ ६८.४० चौ.मी. मुल्य ६.४९.८००, ज मीन व बांधकामाचे एकुण मुल्य १९.८०.५०० रुपये

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/०७/२०२४ रोजी दिली.

**सहाय्यक धर्मदाय आयुक्त शिक्का** **सही/-**
**शक्तीकुमार रा.पाटील**
**अधिक्षक [न्याय शाखा]**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**जळगाव विभाग, जळगाव**

---

**शिरपूर –** पतीच्या सततच्या व्यसनामुळे पत्नी कंटाळी होती. अश्याने पती- पत्नीमध्ये नेहमीच वाद उद्भवत होते. या दरम्यान पतीच्या व्यसनाला कंटाळून त्याला मारहाण केली. यात पतीचा मृत्यू झाल्याची घटना शिरपूर तालुक्यातील कुरखळी येथे घडली. यात खून केल्याच्या संशयावरून थाळनेर पोलिसांनी महिलेविरोधात गुन्हा दाखल केला. श्रावण काशीनाथ धनगर (वय ४३) असे मृताचे नाव आहे. १६ जुलैला दुपारी श्रावण धनगर हा बेशुद्ध झालेला आढळला. ही बाब कळताच परिसरातील लोकांची गर्दी केली. तर श्रावणचा भाऊ गोकुळ धनगर याने पाहिले असता त्याच्या डोक्याच्या मागील भागात इजा होऊन रक्तस्राव झाल्याचे दिसून आले. त्याबाबत विचारल्यानंतर श्रावणची पत्नी संगीता धनगर हिने तो खाटेवरून पडल्यामुळे जखमी झाल्याचे सांगितले. मात्र तिच्या बोलण्यावरून संशय आल्यामुळे गोकुळ धनगर याने त्यांच्या शेजारी चौकशी केली.

---

## निधन वार्ता

# गोजरबाई महाजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धानोरा ता चोपडा** प्रतिनिधी



शिव गल्लीतील रहिवासी गोजरबाई सुखदेव महाजन वय ८६ यांचे वृद्धपकळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या धानोरा विद्यालयाचे शिक्षक पत्रकार वासुदेव महाजन यांच्या आई होत.

---

**तहसिलदार कार्यालय जामनेर जि. जळगाव**

दुरध्वनी क्र.०२५८०/२३००३४ — ई-मेल:-tah.Jamner@gmail.com
क्र.जमाबंदी-२/कावि/५७/२०२४ — दिनांक - १८/०७/२०२४

**-: जाहीर प्रकटन :-**

ज्याअर्थी, श्री आनंदा शामलाल तेली, रा. मोयगाव ता. जामनेर जि. जळगाव यांची मौजे मोयगाव बु. गट नं. २२९/१/ब मधील या शेतजमीनीच्या ७/१२ वरील इतर अधिकारात नमूद सुरेशचंद अशोक कुमार मोतीलाल अपाक गिताबाई भ्र मोतीलाल अवार्ड घेणारा शेरा कमी करणेकामी अर्जदार यांचा विनंती अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअर्थी, सदर अर्जानुसार उपरोक्त जमीनीचे ७/१२ चे इतर हक्कातील सुरेशचंद व अशोक कुमार मोतीलाल अपाक गिताबाई भ्र मोतीलाल अवार्ड घेणार शेरा कमी करणेकामी कोणाचा काही आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी तहसिल कार्यालय, जामनेर जि. जळगाव येथे दिनांक २५/०७/२०२४ पावेतो लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. अन्यथा तदनंतर प्राप्त तक्रारींचा विचार न करता पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. या करीता हे जाहीर प्रकटन केले असे.

**सही/-**
**नानासाहेब आगळे**
**तहसीलदार जामनेर**

---

**नमुना क्र. ७५**

जा.क्र.ACC-१/३२८०/२०२४
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय
जळगाव विभाग जळगाव
दिनांक १६/०७/२०२४

**चौकशी जाहिर नोटीस**
**नोंदणी अर्ज क्र.५५०/२०२४**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.:-** सातपुडा निवासिनी श्री.मनुदेवी सेवा प्रतिष्ठान, आडगांव ता. यावल जि. जळगाव, नोंदणी क्र.ई-५५४/जळगांव
**अर्जदार -** श्री निळकंठ डिगंबर चौधरी

व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सहायक धर्मदाय आयुक्त-१ जळगांव विभाग, जळगांव हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१] उपरोक्त न्यासाच्या परिशिष्ठ १ वर खालील प्रमाणे स्थावर मिळकत नोंदविण्यासंबंधी सदरचा बदल अर्ज दाखल केला आहे.

**स्थावर मिळकत [वर्णन]** - [अ]मौजे आडगांव ता. यावल जि. जळगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील बागायत शेतजमीन गट नं. २८४/अ/२ क्षेत्र १.५४ हे. आर. पो.ख.०.०९ हे. आर. एकुण १.६३ हे. आर. आकार रुपये १.७७ पैसे, चतु:सिमा- पुर्वेस रस्ता, पश्चिमेस गट नं.२८४ /अ/१, उत्तरेस फॉरेस्ट, दक्षिणेस गट नं. २८४/अ/३, [ब] या मिळकतीत पार्कींग शेड मुल्य रुपये १.००.०००, किचन डायनिंग शेड मुल्य रुपये १.२५.०००, विहीर व पंप मुल्य रुपये १.००.०००, इलेक्ट्रीक कनेक्शन रुपये २५.०००

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/०७/२०२४ रोजी दिली.

**सहाय्यक धर्मदाय आयुक्त शिक्का** **सही/-**
**शक्तीकुमार रा.पाटील**
**अधिक्षक [न्याय शाखा]**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**जळगाव विभाग, जळगाव**

---

**नमुना क्र. ७५**

जा.क्र.ACC-१/३२९०/२०२४
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय
जळगाव विभाग जळगाव
दिनांक १६/०७/२०२४

**चौकशी जाहिर नोटीस**
**नोंदणी चौकशी अर्ज क्र.५५२/२०२४**
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.:-** सातपुडा निवासिनी श्री.मनुदेवी सेवा प्रतिष्ठान, आडगांव ता. यावल जि. जळगाव, नोंदणी क्र.ई-५५४/जळगांव
**अर्जदार -** श्री निळकंठ डिगंबर चौधरी

व सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,सहयक धर्मदाय आयुक्त-१ जळगांव विभाग, जळगांव हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१] उपरोक्त न्यासाच्या परिशिष्ठ १ वर खालील प्रमाणे स्थावर मिळकत नोंदविण्यासंबंधी सदरचा बदल अर्ज दाखल केला आहे.

**स्थावर मिळकत** - [१]मुख्य मंदिर गाभार क्षेत्र ४६.५० चौ.मी.किंमत रुपये ५,५८,०००लक्ष [२] मंदिराचा तळ मजल्यावरील हॉल क्षेत्र २५९.८० चौ.मी.किंमत रुपये ५१,९६.०००लक्ष [३] कम्युनिटी हॉल तळमजला क्षेत्र ५०१.३३ चौ. मी. किंमत रुपये १.००.२६.६००लक्ष [४] लोअर लेव्हलस्टोअर रुम क्षेत्र ९३.६० चौ.मी.किंमत रुपये ७.४८.८००लक्ष [५]चेंजिंग रुम क्षेत्र ३०.००चौ.मी. किंमत रुपये ४.८०.०००लक्ष [६] किचन ॲण्ड डायनिंग क्षेत्र ५५.००चौ.मी. किंमत रुपये ४३.०६.५००लक्ष [७] फर्स्ट फ्लोअर शेड [टिन शेड] क्षेत्र ४७९.५०चौ.मी.किंमत रुपये ४३.०६.५००लक्ष [८]फर्स्ट फ्लोअर शेड ऑन टेंम्पल क्षेत्र २५९.८० चौ. मी. किंमत रुपये १९.४८.५०० लक्ष [९] विहीर १२ मीटर व इलेक्ट्रीक व पाईप कनेक्शन किंमत रुपये १.५०.००० लक्ष [१०] आर.सी.सी.ओव्हर हेड वॉटर टँक २० हजार लिटर किंमत रुपये ५.५०.०००लक्ष [११] यज्ञ कुंड जी. जी. आय. कोटेड शेड रुफसह क्षेत्र ९०.०० चौ. मी. किंमत रुपये ९.००.०००लक्ष [१२]पब्लीक टॉयलेट किंमत २.००.०००लक्ष [१३] पाथ वे २५० मी बाय ४ मी रुंद किंमत रुपये १५.००.००० लक्ष [१४]एंटरन्स गेट गिअर व्हिलेज किंमत रुपये १.२५.००० लक्ष [१५] अदर मायनर आर. सी. सी.वर्क किंमत रुपये १०.००.००० लक्ष [१६] एकुण किंमत २.७८.८१.९०० क्रं. १ ते १४ चे घसारा मुल्य २.५०.९३.८०० लक्ष

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२/०७/२०२४ रोजी दिली.

**सहाय्यक धर्मदाय आयुक्त शिक्का** **सही/-**
**शक्तीकुमार रा.पाटील**
**अधिक्षक [न्याय शाखा]**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**जळगाव विभाग, जळगाव**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.१०४/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** रोशन भुरे खान, रा. ६६०/४ कल्लु मिरचीवाला बिल्डिंग,गैबी नगर स्टार हॉटेल जवळ भिवंडी, ता. भिवंडी जि. ठाणे ४२१३०२
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.०१/०६/१९६६ रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर । यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.१०७/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** इब्राहीम खान गुलाब खान,रा. बेलसवाडी ता.मुक्ताईनगर
**//विरुध्द//**
ग्रामसेवक बेलसवाडी **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.०१/०६/१९७४ रोजी मौजे बेलसवाडी ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन ग्रामसेवक बेलसवाडी मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जाहिर नोटीस** — **ॲड.शाह अखलाक ए.के.**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर यांचे न्यायालयात**

**क्र.कुका/दंडप्र/एसआरअर्ज क्र.११२/२०२४**
**दिनांक - २८/०५/२०२४**
**अर्जदार :-** शेख नजीर शेख बशीर, रा. मन्यार मोहल्ला सिड फार्म मुक्ताईनगर
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर **... सामनेवाला/प्रतिवादी**
ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

यापरमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ [३] अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, **त्यांचा स्वत:हाचा जन्म दि.०१/०६/१९७४ रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला / झाले आहे.** उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या **न्यायालयात अर्ज दाखल करुन मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांचा जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.** त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना या व्दारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या **सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर** ता. मुक्ताईनगर जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नाव व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वाक्षरीत**
**गिरीश वखारे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

---

**जाहिर नोटीस**

**यावल येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी साो.यांचे न्यायालयात**

**मृत्यू/जन्म अर्ज नं. १६८/२०२४**
**तारीख ३०/०५/२०२४**
**निशाणी नं. १६८/२०२४**
**अर्जदार :-** वसीम शेख हकीम,रा. सुरत सिटी गुजरात
**//विरुध्द//**
मुख्याधिकारी अधिकारी न. पा.यावल **..... सा.वाले**
**अर्ज - जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १३[३] प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत...**

याव्दारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १३ [३] प्रमाणे जन्माची नोंद होणे प्रमाणे, **अर्जदार यांनी स्वत: नामे वसीम शेख हकीम यांचा जन्म दाखला** मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.**अर्जदार यांनी स्वत: नामे वसीम शेख हकीम यांचा जन्म यावल ता. यावल येथे दि. ३१/१२/१९८४ रोजी** झालेला आहे.त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जाविरुध्द कोणी इसमास हरकत असल्यास **कारण दाखविण्याकरीता दि. ५/७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात व्यक्तीगत किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून जन्म नोंदणी दाखला देण्यात येईल.आज दिनांक **३०/०५/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**मोहनमाला नाझीरकर**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यावल**





# वारी पंढरीच्या विठुरायाची : अविस्मरणीय सोहळा

### !! राम कृष्ण हरी विठ्ठल!!

**हे शब्द ऐकताच मनाला आठवण होते ती पंढरीच्या वारीची..वारी म्हणजे मनाला प्रसन्न करणारी भावना. ज्यामध्ये सर्व वारकरी एकत्र येऊन विठ्ठलाचे नामस्मरण करत असतात आणि हा सोहळा मनाला तृप्त करणारा असतो. पण आजच्या या आधुनिक काळात आपण आपल्या जुन्या रुढी, परंपरा, संस्कृती कुठेतरी विसरत चाललोय. यामुळे आपल्या परंपरा जपल्या तर आपले आयुष्य किती निरागस होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही वारी.**

### वारी म्हणजे काय ? याचा इतिहास काय?

हे जाणून घेऊया. पंढरीच्या वारीची सुरुवात महाराष्ट्रातील वारकरी संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ आणि कार्तिक या हिंदू महिन्यात पंढरपूरला जाण्यासाठी सुरू केली. वारी करण्याची परंपरा ऐतिहासिक काळातील १३ व्या शतकात भक्ती चळवळीचा प्रसार करणाऱ्या वारकरी संतांपासून झाली. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील अकराव्या दिवशी येणाऱ्या तिथीला आषाढी एकादशी म्हणतात. आषाढी एकादशी ही भगवान विष्णूला समर्पित आहे. वैष्णव परंपरेत तिचे विशेष महत्त्व आहे. वारी ही एक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे, तर वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी एक सामूहिक परंपरा आहे.

### रिंगण देखावा, स्वर्गाहून सुंदर

वारी हा जणू स्वर्गातील एक अविस्मरणीय देखावा असतो. यामध्ये सर्व वारकरी एकत्र येऊन टाळ, मृदंग, नृत्य, यांच्या गजरात दंग होऊन पांडुरंगाच्या चरणी लीन होतात. ही वारी आळंदी, पुणे, सासवड, लोणंद, फलटण, नातेपुते, माळशिरस, पसवारी, वेळापूर, भांडशेगा, वाखरी, पंढरपूर या मार्गाने सुरू होत असते. या वारीतील विशेष बाब म्हणजे रिंगण. संत ज्ञानेश्वर तुकाराम या पालखीच्या भोवती गोल फिरणे म्हणजे रिंगण होय. या रिंगणाचा देखावा स्वर्गाहून सुंदर असतो. मनाला तृप्त करणारे ते वातावरण आयुष्यातील सर्वात सुंदर क्षणाप्रमाने असतो.



गायत्री नटराज भंडगर
महालक्ष्मी नगर, नंदुरबार

या रिंगणाची सुरुवात देहू, पुणे, लोणीकाळभोट, परवड, बारामती, इंदापूर, अकलूज आणि वाखरी या ठिकाणी होते. वाखरीला सर्व पालख्यांचे शेवटचे रिंगण होते आणि पालखी पंढरपूर कडे प्रस्थान करते. अशाप्रकारे ही वारी पूर्ण होते.

### मनाला शांतता देणारी ऊर्जा : वारी

वारीतील सर्वात सुखद बाब म्हणजे ती वारी करताना भेटलेला अनुभव. ते प्रंसग हे मनाला प्रसन्न करणारे असतात. वारी ही एकमेव अशी परंपरा आहे, ज्यामध्ये सहभागी होणारा प्रत्येक व्यक्ती अगदी निस्वार्थ भावनेने पांडुरंगाच्या सेवेत तल्लीन होत असतो. खरं सांगायचे म्हणजे जी शक्ती भगवंताच्या नामस्मरणात आहे ती कशात नाही. भक्त पुंडलिकाच्या भक्तीने ती आधीक सिद्ध होते. या वारीबद्दल बोलावे तेवढे कमी आहे. वारी ही मनाला शांतता देणारी एक ऊर्जा आहे. हरिनामाच्या गजरात दंग होऊन त्याची सेवा करणे हीच खरी पंढरी. पंढरपूर ही संतांची भूमी. ज्याठिकाणी असलेले प्रत्येक ठिकाण भक्तीच्या रंगात रंगलेले आहे. हा वारीचा प्रवास माणसाला शिकवून जातो की खरा पांडुरंग हा माणसात असतो. फक्त तो शोधणे गरजेचे असते. अशी माझ्या विठुरायाची शिकवण आहे.




### विठुरायाची शिकवण

वारी ही अनुभवण्याची आणि समजून घेण्याची गोष्ट आहे. ज्याला ही समजली तीच खरी पंढरी. या वारीची सुखद भावना म्हणजे वारकरी संप्रदाय. ज्याला माळकरी संप्रदाय असेही म्हटले जाते. हे माळकरी लोक गळ्यात तुळशीच्या माळा आणि महिलांच्या डोक्यावर तुळस आणि मुखी हरिनामाचा गजर. हे दृश्य अनुभवणे हे स्वर्गापेक्षा कमी नाही. सांगण्याचे तात्पर्य तेवढे की, हजारो पगड जातीतील वारकरी पण एकाही गोष्टीची तक्रार नाही. लाखोंच्या गर्दीतही कधी एकमेकांचा हात न सोडणारा हा वारीचा सोहळा या दोन गोष्टीतून स्पष्ट होतोय. एकमेकांची मन जपणे आणि निस्वार्थ जगणे हीच खरी विठुरायाची शिकवण. ही वारी म्हणजे अमृताचा तो थेंब आहे ज्याच्या स्पर्शाने माणूस अंतर्मणाने निर्मळ होतो. या विठुरायासाठी या काही ओळी मी व्यक्त करते...

**पंढरीचा पांडुरंग तू भक्तीचा पाझर**
**मिटता डोळे माझे जणू मायेचा तू सागर,**
**भक्तीत तुझ्या विठ्ठला मन माझे हे रमले**
**आज मला पांडुरंगा दर्शन तुझे झाले,**
**युगे अठ्ठावीस उभा तू पण तक्रार कसली नाही**
**पाहुनी तुझे प्रेम देवा तूच ठाई ठाई,**
**शब्द अपुरे तुझ्यासाठी ही तुझीच किमया असावी**
**मनापासून एकच इच्छा ही वारी तुझी घडावी,**
**वारीचा तो सोहळा जणू सोन्याची पंढरी**
**गात राहावे मुखी नेहमी राम कृष्ण हरी राम कृष्ण हरी,**
**नाद टाळ मृदुंगाचा जणू गजर तुझ्या भक्तीचा**
**अभंगाने स्पर्श होतो भास तुझ्या दर्शनाचा,**
**एकच मागणे देवा तुझी सोबत कायम असावी**
**पंढरीच्या वारीला माझीही भेट व्हावी,**
**रूप तुझे मोहक देवा माथी चंदनाचा टिळा**
**चरणी मस्तक ठेवुनी होतो पांडुरंग माझा पुरा,**
**तूच माझी आई देवा तूच माझा बाप**
**चरणी तुझ्या विठ्ठला सारे काही माफ**

या आयुष्यात खरा पांडुरंग हा आपल्या विचारात स्वभावात असतो



फक्त ते ओळखणे हे आपल्या हातात असते हेच वारी आपल्याला शिकवते खरा परमेश्वर हा अनुभवात असतो अनुभवातून माणूस सर्वकाही शिकत असतो खरा परमेश्वर हा माणसात असतो फक्त आपली वागण्याची क्षमता तशी हवी...
!! राम कृष्ण हरी विठ्ठल!!




संकलन संयोजन
राहुल पवार ८८०६८८६१६६
कविता ठाकरे ९७६५१३६८७५

---

# अध्ययन निष्पत्ती आणि शिक्षक



कोरोना च्या महाभयंकर संकटानंतर नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक शिक्षणात संपूर्ण भारत भर पायाभूत साक्षरता व मूलभूत संख्याज्ञान यावर सर्वात जास्त भर देण्यात आला. त्यासाठी निपुण भारत अभियान या अभियानाची सुरुवात झाली. त्यानुसार विद्यार्थ्यांचे कोरोना काळात झालेले प्रचंड शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी सर्व शिक्षकांना निपुण भारत मिशन अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले.

२०२७ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान प्राप्त होणे हे एकच ध्येय सर्व शिक्षकांपुढे ठेवण्यात आले. या निपुण भारत प्रशिक्षणात सर्वात जास्त भर होता तो प्रत्येक इयत्तेनुसार ठरवून देण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्ती वर!

**काय आहेत या अध्ययन निष्पत्ती?**

प्रत्येक इयत्तेत दाखल असलेल्या विद्यार्थ्याने त्या इयत्तेत अपेक्षित असलेल्या क्षमतांची संपादणूक केली आहे किंवा नाही ते या अध्ययन निष्पत्ती च्या मदतीने आपल्याला समजते. किंवा विशिष्ट इयत्तेनुसार विद्यार्थ्याला शिक्षकाने कोणत्या किमान आणि कमाल पातळी पर्यंत नेणे आवश्यक आहे ते शिक्षक व पालक या दोघांनाही समजते.

(NIPUN) National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy.

या अभियानातील मूलभूत बदल म्हणजे यात पालकांना देखील सहभागी करून घेतले गेले. अध्ययन निष्पत्ती लिहिलेली छोटी बुकलेट्स पालकांपर्यंत पोहचविण्यात आली. तसेच शाळा स्तरावर प्रत्येक इयत्तेनुसार अध्ययन निष्पत्ती चे तक्ते दर्शनी भागावर लावण्यासाठी देण्यात आले. पालकांचे निपुण मेळावे भरवून त्यांना या अध्ययन निष्पत्ती ची माहिती देण्यात आली. त्यांचा पाल्य नेमका कोणत्या स्तरावर आहे याबाबत त्यांना सविस्तर माहिती या अध्ययन निषपत्तीच्या आधारे देण्यात आली.

माझ्या बाबतीत विचार केला तर इयत्ता १ली च्या वर्गाची वर्गशिक्षिका म्हणून मी सर्वप्रथम इयत्ता १ली च्या भाषा, गणित व इंग्रजी या विषयांना किती अध्ययन निष्पत्ती दिल्या आहेत ती संख्या मोजली. त्यानुसार इयत्ता १ली च्या वर्गासाठी भाषा विषयासाठी १३, गणित १४ व इंग्रजी १७ अशा अध्ययन निष्पत्ती ठरवून देण्यात आल्या आहेत.

शिक्षकाने या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी विविध आनंददायी अध्ययन अनुभवांची योजना करून त्या साध्य करणे अपेक्षित आहे. उदा. इयत्ता १ली साठी १३ नंबरची क्षमता आहे - लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकास स्तरा नुसार चित्रे, आडव्या - तिरप्या रेषा, स्वयं पद्धतीने लेखन, आणि स्वानियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करणे.

आता ही अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी मला शिक्षक म्हणून अध्ययन अनुभवांची छोट्या छोट्या गटात विभागणी करावी लागेल. त्या विशिष्ट अध्ययन निष्पत्तीला साध्य करण्यासाठी योग्यवेळी योग्य अध्ययन अनुभव देणे हे देखील महत्वाचे असेल. सर्वांना समान संधी मिळेल असा अध्ययन अनुभव निवडला गेला पाहिजे.

उदाहरणार्थ. वरील निष्पत्ती साध्य करताना मी मुलांना लेखन शिकवण्यासाठी आधी विविध कार्ड्स चा पुन्हा पुन्हा परिचय देईन. प्रत्येक कार्डवर जे अक्षर असेल ते वाचण्यास सांगण्यात येईल. समजा हे अक्षर ल असेल तर शिक्षक ल पासून सुरू अथवा शेवट होणारे शब्द सांगतील, फळ्यावर लिहितील, ल चा आवाज नेमका कुठे होतो हे समजावून देतील. आता विद्यार्थ्याला त्याने कुठे कुठे ल चा आवाज ऐकला आहे असे विचारतील विद्यार्थी त्याने ऐकलेले ल चे शब्द सांगेल. शिक्षक ते फलकावर लिहितील.

मी वर्गात ल शिकवत असताना माझ्या विद्यार्थ्यांना ल चा आवाज असणारे शब्द शोधण्यास सांगितले तेव्हा एक मुलगा लेक असे म्हणाला. नंतर तो म्हणाला आपल्या आईला एकच असतो तो लेक. मी विचारले म्हणजे काय रे? तर म्हणतो कसा, आपल्या आईला आधी मुली असतात आणि नंतर लेक होतो. आता मात्र मी थक्क झाले. त्याला म्हंटले असे काही नाही आधी लेक होतो आणि नंतर देखील ताई येऊ शकते. पण त्याने त्याच्या अनुभव विश्वानुसार जे निरीक्षण नोंदवले त्यासाठी मला नव्याने अध्ययन निष्पत्ती लिहिण्याची गरज भासली.



ज्योती लक्ष्मण जाधव
शिक्षिका, जिल्हा परिषद शाळा
काळाडोह, यावल

---



# विठू पाह

**डोळा पाहियला । माझा विठुराया।**
**सुंदर ती काया। तया नमू ।। १**

**संसार सोडोनी । जाऊ पंढरीला ।**
**पाऊस पडला । आनंदाचा ।। २**

**रामकृष्ण हरी । गजर नामाचा**
**ज्ञाना तुकोबाचा । जयघोष ।। ३**

**गाभारी चरण । दिसले साजीरे ।**
**तल्लीन सारे। विठुपायी ।। ४**

**नाचत गाजत । वारकरीआले।**
**पारणे फिटले । नयनांचे ।। ५**

**झाला वाळवंटी । नामाचा घोष हा ।**
**विठू पाहे हो हा । मायबाप ।। ६**

**सदासर्वकाळ । स्मरावा हरी ।**
**असावा अंतरी । पांडुरंग ।। ७।।**



मोहिनी नंदकिशोर कुळकर्णी
अमळनेर

---

### अर्थशास्त्र लेख माला : भाग एक

# अर्थशास्त्राची पार्श्वभूमी

**विद्यार्थी मित्रानो, तुमची दहावी - बारावी झाली असेल तर जे विद्यार्थी आर्टस्, कॉमर्स, बीबीए, एमबीए आणि कायद्याचे शिक्षण घेऊ इच्छितात त्यांना अर्थशास्त्र हा विषय असतोच. तसे तुम्ही बेसिक अर्थशास्त्र ८ वी ते १० वी पर्यंत शिकला आहातच. बऱ्याच विद्यार्थ्यांचे म्हणणे असते अर्थशास्त्र फार अवघड विषय आहे. पण तसे नाही बर का! जर तुम्ही यातील संकल्पना नीट उदाहरणासहित समजून घेतल्या तर हा विषय तुमचा आवडीचा होईल. तसेही दैनंदिन जीवनात आपण अर्थशास्त्र त्यातील संकल्पना यांचा वापर करत असतो. तेव्हा अगदी सोप्या शब्दात आपण अर्थशास्त्राची ओळख करून घेणार आहोत.**

आज पासून दैनिक लोकशाही आपल्यासाठी अर्थशास्त्र लेख माला घेऊन येत आहे. अर्थशास्त्र शिकवण्याचा दहा वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या प्राध्यापिका डॉ. रिता मदनलाल शेटीया मॅडम तुम्हाला सरळ, सोप्या आणि उदाहरणासहित अर्थशास्त्र, त्याची मुलतत्वे आणि त्यातील संकल्पना या लेख मालेत मांडतील.

आशा आहे की, हे सदर नक्कीच तुम्हाला आवडेल. केवळ वाचून सोडायचे नाही तर यावर तुमचा अभिप्रायही द्या. यामुळे अजून तुम्हाला काय आणि कसे हवे आहे, याची कल्पना आम्हाला येईल आणि आम्ही ते अजून चांगल्या पद्धतीने तुमच्या समोर आणू.



डॉ. रिता मदनलाल शेटीया
लेखिका, अर्थशास्त्र (प्राध्यापिका), पुणे
मेल. drritashetiya14@gmail.com

### अर्थशास्त्राची पार्श्वभूमी

अर्थशास्त्र एक सामाजिक शास्त्र असून ते सेवा व उत्पादनांच्या निर्मिती, वितरण आणि वापर या विषयाचा अभ्यास करते. इंग्रजीत अर्थशास्त्राला इकॉनॉमिक्स असे म्हणतात. इकॉनॉमिक्स हा शब्द ग्रीक शब्द ओईकोनोमिया पासून आला आहे. ज्याचा अर्थ होता - घरगुती /कौटुंबिक व्यवस्थापन करणे. हे अर्थशास्त्र राष्ट्राच्या संपत्तीचाही अभ्यास करते. अर्थशास्त्राच्या विद्वान अभ्यासकांना अर्थशास्त्रज्ञ किंवा अर्थतज्ज्ञ असे म्हणतात.




आर्य चाणक्य यांनी इसवी सनापूर्वीच्या तिसऱ्या शतकात अर्थशास्त्रावर आधारित अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात राजकारण, तत्त्वज्ञान व अर्थशास्त्राचे अनेक महत्त्वाचे नियम सांगितले आहेत. अर्थशास्त्राला पूर्वी राजकीय अर्थशास्त्र असे म्हटले जात होते, त्याला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा नव्हता तर अर्थशास्त्र हा विषय १८ व्या शतकापर्यंत राज्यशास्त्राचा एक भाग मानला जात होता परंतु सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी सन १७७६ मध्ये आपला अर्थशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ राष्ट्राची संपत्ती लिहून अर्थशास्त्राला राज्यशास्त्रापासून वेगळे केले व तेव्हापासून अर्थशास्त्र हा स्वतंत्र विषय म्हणून मान्यता पावला, म्हणून ॲडम स्मिथला ''आधुनिक अर्थशास्त्राचा जनक'' असे संबोधले जाते.

पॉल सॅम्युलसन यांनी अर्थशास्त्राचे वर्णन '' सामाजिक शास्त्रांची राणी'' असे केले आहे. अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तुणीकीचा अभ्यास करते. साध्या शब्दात, अर्थशास्त्र म्हणजे : ''मानवाच्या अमर्यादित गरजा आणि मर्यादित साधन सामग्री यांचे मेळ घालणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. ''

**क्रमशः**

---

### पावसाळी भाज्या भाग ६


# कुलू (फोडशी)

**पावसाळा सुरू झाल्यानंतर अगदी प्रथम बाजारात येणारी भाजी कुठली असेल तर ती कुलुची भाजी. याला कारण म्हणजे ह्या झाडाचा अगदी वैशिष्ट्यपूर्ण असा जीवनक्रम. पावसाचा थोडा जरी शिडकावा होऊन जमीन ओली झाली तरी लगेचच दुसऱ्या दिवशी जमिनीत असलेल्या कंदामधून पाने बाहेर पडतात. कांद्याच्या पातीप्रमाणे गर्द हिरव्या रंगाची ही पाने दोन दिवसांतच चार ते पाच होतात. तिसऱ्या दिवशी ह्या झाडांच्या पानांमधून चक्क फुलांचा दांडा कळ्या घेऊन बाहेर पडतो व पांढऱ्या रंगाची फुले उमलतात. चौथ्या-पाचव्या दिवशी तर ह्या कळ्यांच्या जागी फळेही लागलेली दिसतात. साधारण एक आठवड्याच्या आतच ह्या झाडाचा जीवनक्रम पूर्ण होतो. म्हणूनच पाऊस सुरू झाला की दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीच ही भाजी बाजारात येते. शक्तीवर्धक असलेल्या मुसळीच्या प्रकारातीलच हे झाड आहे. वर्षातून फक्त एक आठवडाच उपलब्ध असलेल्या ही भाजी इतर पालेभाज्यांसारखीच नुसती कांद्यावर परतून केली तर फारच चविष्ट लागते.**

साहित्य:
* कुलूच्या ३-४ जुड्या (ह्यातील वरची हिरवी पात घ्यायची मध्ये जर दांडा, काडि असेल तर काढायची व खालील पांढरा भाग चिरताना घ्यायचा नाही. ही भाजी धुवून, चिरून घ्यावी)
* पाव वाटी कोणतीही डाळ. (चणाडाळ असेल तर भिजवून घ्यावी)
* २ कांदे चिरून
* २-३ ओल्या मिरच्या चिरून
* ४-५ लसुण पाकळ्या ठेचून
* पाव चमचा हिंग,
* अर्धा चमचा हळद
* चवी पुरते मिठ
* अर्धा चमचा साखर
* खवलेले ओले खोबरे पाव वाटी
* २ मोठे चमचे तेल



कृती:
* प्रथम तेल गरम करुन त्यात लसूण मिरचीची फोडणी द्या.
* नंतर त्यात हिंग, कांदा हळद घालून परतवा.
* लगेच चिरलेला कुलू आणि डाळ घालून परतवून वाफेवर ही भाजी शिजवत ठेवा.
* डाळ शिजत आली की मीठ, साखर घाला.
* परत परतवून ३-४ मिनीटांनी ओलं खोबरं घालून गॅस बंद करा.



अपर्णा स्वप्निल कांबळे-नांगरे
पत्रकार/फुड ब्लॉगर, मुंबई
मो. ९८९२१३८१३२

---

# भारताचे संविधान...

**कविवर्य कै. वामनदादा कर्डक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानातील योगदानाचे महत्त्व आपल्या गीतातून सांगतात. जगातील देखणी, अहो. . जगातील देखणी. . बाई ग भिमाचे लेखणी. . भिमाची लेखणी. . . अनेक अशा परंपरा या सर्वांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांग सुंदर अशा संविधानाच्या माध्यमातून एका समतेच्या मंचावर एकत्रित बसवण्याचे महान कार्य केलेले आहे.**

भारतीय संविधानातील मूल्ये आणि त्यातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान याच बरोबर संविधानाने निर्माण केलेली शासन यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय संबंधातील भारताचे स्थान या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील कामकाज अतुलनीय असे आहे. भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास २६ जानेवारी १९४९ पासून सुरुवात झाली. तेव्हापासून ते आतापर्यंत संविधानाच्या आधारे जो राज्यकारभार झाला त्यातून भारतातील लोकशाहीचे स्वरूप अधिकाधिक व्यापक होत गेले आहे.

संविधानाचे महत्त्व समजून घेण्यासाठी संविधानाची निर्मिती समजून घेणे हे सुद्धा प्रत्येक भारतीयाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. संविधान सभेची पहिली बैठक दिनांक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली या संविधान सभेचे कामकाज दोन वर्ष ११ महिने व १७ दिवसांपर्यंत चालले या कालावधीत संविधान सभेची ११ सत्रे व १६५ बैठकी संपन्न झाल्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संघ संविधान समितीचे सदस्य होते. या समितीचा अहवाल संविधान सभेच्या अध्यक्षांना पंडित ४ जुलै १९४७ रोजी सादर केला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध समित्यांवर जे कार्य केले ते अत्यंत मोलाचे व उपयोगी मानले गेले आणि काँग्रेसच्या नेत्यांची मी संकोचपणे खात्री पटली की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सेवा घेतल्याशिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण आणि विधी नियमीकरण सहज सुलभ होणार नाही. त्यासाठी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद





यांनी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री बीजी खेर यांना पाठवलेल्या ३० जून १९४७ च्या पत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेवर त्वरित निवड व्हावी असे सुचविले.

१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्यदिनी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मंत्रिमंडळात सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते निमंत्रण स्वीकारले व ते भारताचे व २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने एकमताने त्यांची संविधान सभेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. १३ फेब्रुवारी १९४८ पर्यंत एकूण ४४ सभा झाल्या यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीने सर्व कार्यभार सांभाळला मसुदा समितीने संविधानाचा २१ फेब्रुवारी संविधान सभेच्या अध्यक्षांना सादर केला. वरील सर्व घटनांचा संदर्भ लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेचे कामकाज प्रत्येक परिशिष्टावर संविधान सभेत सविस्तर चर्चा करून सदस्यांचे शंका निरसन करून सर्वांग सुंदर असे संविधान या भारताला व भारतीय जनतेला बहाल केले.

भारताचे संविधान हे सुवर्णाक्षरांनी लिहिलेले ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. देशाची एकता एकात्मता व अखंडता कायम टिकून आहे श्रेय संविधानाला दिले जाते. प्रत्येक माणूसप्रत्येक समाज हा विविधतेने नटलेला आहे या समाज व्यवस्थेत सुखी व अभिव्यक्ती संपन्न असे जीवन जगत आहे ही सारी करामत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाची आहे प्रत्येक भारतीय नागरिकाला एक सुरक्षित आणि निर्भय वातावरणात जीवन जगण्याचे भाग्य लाभले आहे आपल्या संविधानाची आम्हा साऱ्या भारतवासीयांना मिळालेली अनमोल अशी देणगी आहे.

संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक भारतीयाला त्याच्या उद्धारार्थ उन्नतीचा मूलमंत्र च दिला आहे त्याचा स्वीकार करून प्रत्येक भारतीय जीवन जगला तर त्याचा उद्धार आहे. लोकशाही शासन पद्धती ही समाजवादाला बळ देणारी फार मोठी शक्ती आहे. त्या लोकशाहीचे परिणामी भारताच्या संविधानाचे प्रत्येक भारतीयांनी प्राणपणाने रक्षण करणे महत्त्वाचे आहे.



अश्विनी योगेश कोळी
उपशिक्षिका, भारत विद्यालय,
न्हावी, फैजपूर. मो. ९०९६९३२९२५

## कोळंबे विद्यामंदिराचे विद्यार्थी झाले बालवारकरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

शहरातील सौ. तु. ल. कोळंबे प्राथमिक विद्यामंदिराचे विद्यार्थी आज आषाढी एकादशी निमित्त बाल वारकरी झाले होते. आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी सोहळा घेण्यात आला. यावेळी सकाळी आठ वाजता शाळेची दिंडी काढण्यात



आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी संत, वारकरी यांचे वेशभूषा साकारून सजीव देखावा देखील तयार केला होता. विठू नामांचा व संतांचा जयघोष करत तु. ल. कोळंबे शाळेपासून परिवर्तन चौकात जाऊन पुन्हा शाळेच्या ठिकाणी दिंडीचा समारोप झाला. विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंग, लेझीम व वेशभूषा यामुळे पायी दिंडी सोहळा शहरात आकर्षक ठरला. तसेच विद्यार्थ्यांनी फुगडी खेळून

(पान २ वर)

## महत्वाचे

### अवैध गुटखासह तीन लाखाचा मुद्देमाल जप्त

**रावेर –** रावेर पोलिसांनी अवैध गुटखा वाहतूक प्रकरणी मोठी कारवाई करत वाहनासह सुमारे ३ लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रावेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांना बऱ्हाणपूरकडून एक टाटा मॅजीक वाहन गुटखा घेऊन येत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानुसार पथकाने येथील रुची मोटर्स जवळ गुटखा वाहतुक करणाऱ्या एमपी- ६८, टी- ०२२७ क्रमांकाच्या वाहनाची तपासणी केली. यामध्ये त्यांना ७ गोण्यांमध्ये १ लाख १२ हजार ८०० रुपयांचा पान मसाला व तंबाखुयुक्त गुटखा मिळून आला. पोलीसांनी २ लाख रुपये कीमतीची टाटा मॅझीक गाडी असे ३ लाख १२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुटखा राज्यात प्रतिबंधित असतांना गुटख्याची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनचालक नदिमखान ईस्माईल खान (वय ३५, रा. कोतवाल वाडा रावेर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

### राज्यात मुसळधार पावसाचा हाय अलर्ट

**मुंबई –** राज्यात पावसाने चांगलाच जोर धरलेला दिसून येत आहे अश्यात पुन्हा हवामान विभागाने राज्यात पुढील १२ तासांसाठी हाय अलर्ट जारी केला आहे. ज्या जिल्ह्यांना अलर्ट देण्यात आला आहे त्या भागात आज जोरदार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. राज्यात १९ जुलैपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. त्यानुसार, सकाळपासून मुंबईसह राज्याच्या अनेक भागात मुसळधार पाऊस कोसळत होता. दुपारनंतर पावसाने जोर धरला. ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, परभणी, वर्धा, अमरावती आणि सातारा या जिल्ह्यांसाठी हवामान खात्याने दिला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर, रत्नागिरीला पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांलाही हवामान खात्याने पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे.

### चक्क 'फोन पे' वरून घेतली लाच

**छत्रपती संभाजीनगर –** ऑनलाईनच्या जमान्यात ऑनलाईन लाच घेऊन या पठ्ठ्याने लाच क्षेत्रात नवा पायंडा पडला आहे. ऑनलाईन लाच घेताना त्या हवालदाराच्या व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे जोरदार चर्चा सुरु आहेत. दरम्यान, या प्रकारामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्या पोलीस कर्मचाऱ्यावर काय कारवाई होणार? किंवा त्याची काहीच दखल घेतली जाणार नाही? यावर चर्चांना उधाण आले आहे. छत्रपती संभाजीनगरात वाहतूक पोलिसाने सिट बेल्ट न लावल्यामुळे एका कारचालकाला पकडले. त्यांना अडीच हजार रुपये दंड भरावे लागणार असल्याचे सांगितले. कारचालक शंभर रुपये देत होतो. तेव्हा शंभर रुपये नका देऊ, असे म्हणत तुम्हाला अडीच हजार रुपये दंड सांगितला होता. तुमचे अडीच हजार वाचवत आहे.

# राज्याच्या पर्यटन धोरणातून १८ लाख रोजगार निर्मिती होणार

## पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांची विशेष माहिती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचे पर्यटन धोरण – २०२४ तयार करण्यात आले आहे. पर्यटन धोरणाद्वारे राज्यात अंदाजे १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे. यामध्ये दहा वर्षात पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री श्री. महाजन म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात त्यासाठी उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करुन ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील लघु, मध्यम, मोठे, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब, क, गटांमध्ये विभागण्यात आले असून त्यांना गुंतवणूक व रोजगार निर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलतींचा धोरणात समावेश आहे. ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी होम स्टे, ॲग्रो टुरिझम या स्पर्धा विभागनिहाय राबविण्यात येणार आहेत. या धोरणामुळे राज्याचा देशातील राज्यांमध्ये अग्रेसर राज्य श्रेणीत समावेश होणार आहे.



देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार-उत्पन्न आणि उद्योजकता यांना चालना देणे, पर्यटन क्षेत्रामध्ये ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणूक आणणे, राज्याच्या महसुलात वाढ करणे, राज्यातील वैविध्यपूर्ण, बहुप्रांतीय, बहुभाषिक संस्कृती लक्षात घेता स्थानिक लोकसंस्कृतीवर आधारित कार्यक्रम आणि उत्सवाचा पर्यटनाच्या विकासासाठी उपयोग करुन घेणे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे यावर या धोरणात भर देण्यात येणार आहे. एक खिडकी प्रणालीच्या संस्थात्मकीकरणासह खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण निर्माण करणे. केंद्र शासनाच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केले जाणार आहे. पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज व अनुदान प्रोत्साहन, महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, भिन्न सक्षम घटक यांना अतिरिक्त प्रोत्साहन, देश-परदेशातील पर्यटन प्रदर्शन, ट्रॅव्हल शो- मार्टमध्ये सहभागासाठी पर्यटन भागधारकांना प्रोत्साहन, ग्रामीण पर्यटन मेळावा, वार्षिक मेळावा आयोजनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १५ लक्ष पर्यंत), मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क सूट, युवा पर्यटनासाठी प्रोत्साहन, पर्यटन पुरस्कार, कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन, पर्यटन/आदरातिथ्य उद्योगातील संशोधनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), माहिती आणि

(पान २ वर)

## पक्षीमित्राने चष्मेवाल्याची केली केसाच्या फासातून सुखरूप सुटका

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव** प्रतिनिधी

आयुध निर्माणी कर्मचारी व चातक निसर्ग सर्वधन संस्थेचे व पक्षीमित्र हे सायंकाळच्या वेळी घराच्या परिसरात फेर फटका मारत असताना अचनाक एका झाडाकडे लक्ष वेधले गेले. झाडाच्या फांदीला काहीतरी लोंबकळत असल्याचे लक्षात येताच जवळ जाऊन पाहिले तर गळ्या भोवती केसाच्या फासात अडकलेला चष्मेवाला अढळला. त्याला जवळ घेत मानेभोवतालचा केसाचा फास मोकळा करून त्याला निर्सगाच्या भ्रमतीसाठी सुखरूप रवाना केले. चातक निसर्ग संवर्धन संस्थेचे व पक्षी अभ्यासक अनिल महाजन हे नेहमी प्रमाणे सायकाळच्या वेळी



घराच्या परिसरात फिरण्यासाठी जात असताना आयुध निर्माणी वसाहतील संतोषी माता मंदिराजवळ कडू लिंबाच्या झाडाच्या फांदीला काहीतरी लोंबकळत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कुतुहतेने महाजन त्या झाडजवळ जाऊन

(पान २ वर)

## सकल मुस्लिम समाजातर्फे विशालगड हल्ल्याचा निषेध

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

येथील सकल मुस्लिम समाज व मुस्लिम मंचतर्फे कोल्हापूर येथील विशालगडावर हल्ल्या करणारे व मस्जिद, दर्गा व अल्पसंख्यांक समाजाचे घराचे नुकसान करणारे दंगल खोरांवर कठोर कारवाई मागणी चे निवेदन मा. तहसीलदार यांचे मार्फत मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, व गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले. सदर घटना १४ जुलै रोजी घडली विशाल गडावर झालेल्या हिंसक वातावरणामुळे अल्पसंख्यांक



समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्यांना महाराष्ट्र शासनाने ताबडतोब नुकसान भारपाई द्यावी व तोडफोड करणारे दंगल खोरांना शोधून कडक व कठोर कारवाई करा अशी एक मुखी मागणी आम्ही मुस्लिम मंच मुक्ताईनगर व सकल मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली. ह्या वेळी विविध पक्षाचे राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. सदर निवेदन देतांना मा. हकीम आर चौधरी (जिल्हा उपाध्यक्ष मुस्लिम मणियार बिरादरी) अफसर खान (शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य) शकील

(पान २ वर)

## सावदा प्राथमिक विद्यामंदिरात विठ्ठल नामाचा गजर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा** प्रतिनिधी

येथील प्राथमिक विद्यामंदिर देशमुख वाडा सावदा या शाळेमध्ये आषाढी एकादशी विठ्ठल नामाच्या गजरात उत्साहात साजरी करण्यात आली. प्राथमिक विद्यामंदिर देशमुख वाडा येथून संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम राणे यांनी सपत्नीक पूजा करून पालखी सोहळ्याला सुरुवात केली. याप्रसंगी शाळेतील पहिली ते सातवी पर्यंतच्या ३०० मुला-मुलींनी सहभाग घेतला होता. यादरम्यान मुला-मुलींनी वारकरी संप्रदायाचा पारंपारिक पोशाख परिधान करून विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला या हरिनामाच्या गजरात लेझीम खेळत शहरातील



प्रमुख मार्गावरून पालखी काढली. त्याचप्रमाणे दिंडी मार्गातील गांधी चौक परिसरात अभंगांचा नाद करून नृत्य सादर केले यावेळी माजी नगराध्यक्ष राजेंद्र चौधरी यांनी सर्व दिंडीत सहभागी लहान बालगोपालांना चॉकलेट व खजूर

(पान २ वर)



## लाडकी बहिण योजना नोंदणी शुभारंभ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** प्रतिनिधी

राज्यातील महिलांना आत्मनिर्भर व स्वावलंबी होण्यासाठी महायुती सरकारच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा या करीता शहरातील ना. गिरीष महाजन यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोफत नोंदणी शुभारंभ करण्यात आला. यावेळी नोंदणी झालेल्या महिलांना प्रमाणपत्र देखील वाटप करण्यात आले. जामनेर तालुक्यातील तसेच शहरातील सर्व माता – भगिनींनी या मोफत नोंदणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यावेळी करण्यात आले. याप्रसंगी तालुका एज्युकेशन सोसायटीचे सचिव जितेंद्र पाटील, माजी नगरसेविका संध्या पाटील,

(पान २ वर)

## संत मुक्ताबाई महाविद्यालयात वृक्षारोपण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

संत मुक्ताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी "वृक्षारोपणही काळाची गरज आहे, यात शंकाच नाही. पण, वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे आहे." असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आय डी पाटील यांनी केले. यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांची उपस्थिती होती. "ग्लोबल वॉर्मिंगचे संकट मोठे असून पुढच्या पिढीला जर या



संकटापासून वाचवायचे असेल तर वृक्षारोपण करून आपल्या वसुंधरेचे रक्षण करणे ही खरी महत्त्वाची आणि मूलभूत अशी गरज बनलेली आहे. वातावरणामध्ये होत असलेले बदल चांगले नसून त्यामुळे वाढलेल्या तापमानाचा जनजीवनावर तसेच एकूणच पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो आहे. वृक्षारोपण हे छोटेसे पाऊल असले तरी वृक्ष संवर्धनाच्या माध्यमातून एक मोठे पाऊल पुढच्या पिढीसाठी टाकता येईल." असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आय डी पाटील यांनी केले. वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कोना कॉर्पस, रामफळ,

(पान २ वर)

## राखेचे ट्रॅक्टर उलटल्याने तरुणाचा मृत्यू

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव** प्रतिनिधी

भुसावळ तालुक्यातील विल्हाळे येथील राखेच्या बंडात राख वाहणारे ट्रक्टर उलथून त्या खाली दाबल्या गेल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. या बाबत पोलीसानी दिलेल्या माहितीनुसार असे, औष्णीक विज केंद्रातून कोळशीची जळालेली राख विल्हाळे बंडात जमा झालेली राख विट भट्टी व इतर कामासाठी वापरली जात असल्याने राखेची मोठ्या प्रमाणात बंडातून टॅक्टर व इतर वाहनाने वाहतूक केली जाते. बंडात जाणारा रस्ता मोठा जिकरीचा



असल्याने वाहन चालकाना त्या रस्त्यावर चांगलीच कसरत करुन राखेची वाहतूक करावी लागते. याच रस्तावर किरकोळ अपघात नित्याचेच झाले आहे. आशा जीवघेण्या रस्त्यावर मध्यप्रदेश येथुन मजुरीसाठी आलेला व सध्या विल्हाळे येथे स्थायीक असलेला विशाल तारसिंग तलोले (भिलाला)

(पान २ वर)

## आयुष्यात ध्येय ठरविल्याशिवाय यश नाही : खा.वाघ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

जी व्यक्ती कष्ट, मेहनत व जिद्दीने पुढे जाते त्याला यश हमखास मिळत असते. जो शिकतो, ध्येय गाठतो त्याला कुठल्याच आरक्षणाची गरज पडत नसून आयुष्यात ध्येय ठरविल्याने यशाचा मार्ग सोपा होत असल्याचे उद्गार जळगाव लोकसभेच्या खासदार स्मिता वाघ यांनी काढले. खानदेश शिक्षण मंडळ संचलित जी. एस. हायस्कूल च्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी होते. यावेळी पुढे बोलतांना खासदार स्मिता वाघ यांनी सांगितले की, राज्याच्या शैक्षणिक प्रगतीत



खानदेश शिक्षण मंडळाचा विशेष वाटा राहिला आहे. मराठी शाळा टिकल्या पाहिजेत यासाठी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेला विद्यार्थ्यांसाठी व्यायामशाळा तसेच अटल लॅब च्या माध्यमातून निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्योपाध्यक्ष सी. ए. नीरज अग्रवाल, अध्यक्ष जितेंद्र झाबक, उपाध्यक्ष जितेंद्र देशमुख, माधुरी पाटील, विश्वस्त वसुंधरा लांडगे, संचालक योगेश मुंदडे, प्रदीप अग्रवाल, डॉ. अनिल शिंदे, शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी, संस्थेचे देणगीदार विवेकानंद भांडारकर, अभिजित भांडारकर, निलेश भांडारकर, अनिल वैद्य, संस्थेचे सचिव डॉ. ए. बी. जैन, सहसचिव प्रा. धीरज वैष्णव, माजी संचालक प्रवीण जैन, शिक्षक प्रतिनिधी विनोद कदम, लायन्स क्लब चे विनोद अग्रवाल, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुखदेव माळी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर. सी. मोराणकर, व्ही. व्ही. कुलकर्णी, द्रो. रा. कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका एस. एस. सूर्यवंशी, कैलास पाटील, स्वप्ना शिसोदे, सुनंदा चौधरी, ए. डी. भदाणे, एस. आर. शिंगाने, सी. एस. सोनजे, एस. पी. वाघ, के. पी. पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. अनिल शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मराठी शाळांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शिक्षक भरती हा महत्वाचा प्रश्न असून तो सोडविण्यावर शासनाने भर देण्याची गरज आहे. शाळेचे चेअरमन हरी भिका वाणी यांनी शाळेच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी केक कापण्यात आला, शालेय ध्वजाचे

(पान २ वर)

## विद्यार्थ्यांची वन विभागात आषाढी साजरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

कासोदा रस्त्यालगत असलेल्या टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने वन विभागाच्या अधिकाऱ्यांन सोबत आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. यावेळी याप्रसंगी वारकरीच्या वेशात असलेल्या विद्यार्थ्यांसोबत पारोळ्यातील वन परिक्षेत्र विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी आषाढी एकादशी निमित्ताने मुलांना फराळी फळ वाटप करून आषाढीचा एकादशीचा आनंद द्विगणीत केला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आषाढ महिन्यात येणारी एकादशी तिथी देवशयनी एकादशी आणि आषाढी एकादशी म्हणून ओळखली जाणारी यादिवशीचे खास आकर्षण म्हणजे पंढरपूर यात्रा, वारी, वारकरी आणि पालखी होय.



हेच औचित्य साधून टायगर इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी यांनी पालखी रिंगण करून पायी दिंडी चा सजीव देखावा निर्माण केला होता त्यात विठ्ठलाचे गीत गात, लेझीम फुगड्या खेळत, रींगण व विविध खेळ खेळत आनंदाने साजरा करण्यात आले.

या समयी पारोळा वनपरिक्षेत्रातील मुख्य वनरक्षक एस बी दिसले, रेखा खैरनार, व अन्य वनपरिक्षेत्रातील कर्मचारी यांनी टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांना एकादशी निमित्ताने फराळ स्वरूपात फळ वाटप केलीत. आषाढी एकादशी हा वारकरी बांधवांसाठी वर्षभरातील सर्वात खास दिवस आहे. असे मनोगत वनरक्षक देसले यांनी व्यक्त केले, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी टायगर इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन

(पान २ वर)

## लॉर्ड गणेशाचा विट्ठल गजरातुन 'पर्यावरण वाचवा' संदेश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सर्व राज्यात वातावरण विठ्ठलमय झाले आहे. त्यानिमित्ताने विठुरायाच्या आणि आषाढी चे महत्त्व चिमुकल्यांना समजावे म्हणून अखंड परंपरा पाळुन जामनेर शहरातील लॉर्ड गणेशा इंग्लिश स्कूलच्या वतीने भव्य पर्यावरण पुरक दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. आषाढी एकादशी हे फक्त निमित्त होते तर पर्यावरणाचा होत असलेला र्हास व निसर्गाचा बिघडलेला समतोल वाचविणे हाच खरा उद्देश या दिंडीचा होता. प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याने एक तरी एक झाड लावले पाहिजे तर त्यांचे संवर्धन व संगोपन पाल्याप्रमाणे केले तर पर्यावरणाचा होणारा र्हास कमी होईल. मानवाला आरोग्य धन संपदा ठेवण्यासाठी जागतिक पर्यावरण दिन साजरा करुन झाडांची काळजी घेणे आवश्यक आहे. व्रुक्षतोडीमुळे झाडांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण सुद्धा कमी झालेले आहे. यामुळे सुद्धा पर्यावरणाचा



समतोल बिघडलेला आहे. हिच खरी जनजागृती पर दिंडी सर्वत्र शहरात काढण्यात आली होती. विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, विठोबा रखुमाई, संत निळोबाराय, संत सावता, राष्ट्रसंत गाडगेबाबा, संत गोरोबा, यांच्या वेशात हा दिंडी सोहळा काढला होता. या दिंडी सोहळ्यात मुलींनी नऊवारी साडी तसेच मुलांनी कुर्ता पायजमा नेहरू धोतर मुलींनी डोक्यावर घेतलेले तुळशी वृंदावन व मुलांनी म्रुदंग वादन हे विशेष आकर्षण दिसुन आले होते. बाळ गोपाळांचा दिंडी सोहळा पाहण्यासाठी मोठा जनसमुदाय अवतरला होता. विठ्ठल रखुमाई वारकरी अशा वेगवेगळ्या पोशाखातील विद्यार्थ्यांनी काढलेली दिंडी अन माऊली माऊलीच्या जयघोषाने नवचैतन्य विठ्ठलमय वातावरण पसरले होते. फुगड्या खेळुन "व्रुक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या अभंगानुसार व्रुक्षांचे महत्त्व पटविण्यात आले. खास आकर्षण म्हणजे कुठल्याही प्रकारचे वाहन सामील न करता प्रदुषण विरहित बैलगाड्यांचा वापर या दिंडीत केला होता. राजमाता जिजाऊ चौकात विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन माजी नगराध्यक्षा साधना महाजन तसेच तालुका एज्युकेशन सोसायटीचे सचिव जितेंद्र पाटील तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी नितीन बागुल सपत्नीक व सरकारी वकील अनिल सारस्वत सपत्नीक करण्यात आले.

त्याप्रसंगी अध्यक्ष हेमंत ललवाणी, सचिव अभयकुमार बोहरा, सहसचिव दिपक पाटील, सदस्य – अभय सांखला, राहुल साबद्रा, विनोद बुळे, यांच्या सह मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका कर्मचारी यांनी दिंडी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

दैनिक लोकशाही
'लोक'राज्य next

# रक्षाबंधनाला मिळणार लाडकी बहीण योजनेचे पैसे

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजनेचे पैसे पुढील महिन्यात रक्षाबंधनाच्या सणादरम्यान दिले जाणार आहेत. रक्षाबंधनाचा सण १९ ऑगस्टला साजरा होत आहे. त्यावेळेस या योजनेचा पहिला हफ्ता दिला जाणार आहे. काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थ मंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह देवेंद्र फडणवीस गडचिरोली जिल्ह्यात एका कार्यक्रमानिमित्त गेले होते. यावेळी त्यांनी या योजनेच्या मानधनाबद्दल माहिती दिली.


# नेतृत्वबदलाची मागणी, भाजपमध्ये खांदेपालटाची मलमपट्टी

## लोकसभेत केविलवाणी कामगिरी : मोदी–शहांशी चर्चा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

लोकसभेतील विजयाची चावी मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशातील प्रतिष्ठेच्या अयोध्या मतदारसंघासह राज्यभर भाजपची केविलवाणी कामगिरी झाल्यानंतर या 'शिस्तप्रिय' पक्षात राज्य नेतृत्वबदलाच्या मागणीचे वादळ घोंघावत आहे. निवडणुकीनंतर पक्षांतर्गत वाद उफाळून आल्याने राज्यात संघटनात्मक व सरकार या दोन्ही पातळ्यांवर मोठ्या फेरबदलांची चाहूल लागली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पदावरून दूर करणे भाजप नेतृत्वाला परवडणारे नसल्याने, तूर्त प्रदेश भाजपमध्ये फेरबदलांची मलमपट्टी केली जाण्याची चिन्हे आहेत.

उत्तर प्रदेशातील राजकीय परिस्थितीवर भाजपमध्ये लखनै ते दिल्लीपर्यंत बैठकांचे



सत्र सुरू आहे. नाराज उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्यापाठोपाठ भाजप प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली व पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा देऊ केला. चौधरी यांनी तासभर चर्चा करून मोदी यांना राज्यातील भाजपच्या कामगिरीबाबतचा आढावा मांडला. या भेटीनंतर काही वेळातच गृहमंत्री अमित शहा पंतप्रधान मोदी यांच्या भेटीसाठी पोहोचले. उभयतांत दोन तास चर्चा झाली. त्यानंतर चौधरी पुन्हा अमित शहा यांच्याकडे पोहोचले. मोदी व शहा यांच्या भेटीदरम्यान चौधरी यांनी पक्षाची निवडणूक कामगिरी, राजकीय परिस्थिती, संघटनेच्या स्थितीची माहिती दिली. मौर्य गट व त्याआडून इतर नेते कमालीचे सक्रिय झाले असतानाच मुख्यमंत्री आदित्यनाथ हे सुद्धा उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांची भेट घेण्यासाठी राजभवनात पोहोचले आणि चर्चेला उधाण आले. आगामी विधानसभा अधिवेशनापूर्वीची ही शिष्टाचार भेट असल्याचे सांगितले जात असले, तरी राज्य भाजपमधील अंतर्गत भांडणाची चर्चा रंगली.

### मातृसंस्थेला लागली चाहूल

भाजपच्या उत्तर प्रदेशातील दारुण कामगिरीनंतरची पक्षातील धुसफूस भांडणात परिवर्तित होत असल्याची चाहूल सर्वप्रथम भाजपच्या मातृसंस्थेला लागली होती. त्यामुळे लोकसभा निकालानंतर लगेचच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्याशी बंदद्वार चर्चा केली होती. पक्षातील सध्याच्या घडामोडी पाहता, भाजपमध्ये प्रदेशाध्यक्ष बदलाची शक्यता आहे; मात्र, योगी यांच्यावरच राज्यातील खराब कामगिरीचा ठपका ठेवण्याची विरोधी नेत्यांची मागणी लगेच मान्य होण्याची शक्यता नाही.

### ३० जणांची समिती

मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या दोन बैठकांमध्ये अनुपस्थित राहिलेल्या उपमुख्यमंत्री मौर्य यांनी सुमारे २० दिवस मौन पाळले होते. मात्र, भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांनी, 'मी आधी भाजपचा कार्यकर्ता व नंतर उपमुख्यमंत्री आहे,' असे जाहीर सांगितले. त्यानंतर त्यांना तातडीने दिल्लीत बोलावून भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांना भेटण्यास सांगण्यात आले. मात्र, तरीही ते योगी सरकारविरुद्ध प्रदेश भाजप संघटना या भूमिकेवर ठाम आहेत. या बैठकीत मौर्य यांच्यासह योगीविरोधी गटाने आक्रमक पवित्रा स्वीकारला होता. दुसरीकडे आगामी विधानसभा पोटनिवडणुकांसाठी योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी ३० जणांची समिती नेमली; मात्र त्यात मौर्य व ब्रजेश पाठक यांना स्थान दिले नाही.

# कन्नडिगा आरक्षणावरुन वाद; शंभर टक्के नोकऱ्या भूमिपुत्रांना?

## कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी पोस्ट हटवली

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**बेंगळुरू** प्रतिनिधी

कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने खासगी क्षेत्रात गट 'क' आणि 'ड'च्या पदांसाठी कन्नडिगांना शंभर टक्के आरक्षण देण्याच्या आपल्या निर्णयाबाबत बुधवारी बचावात्मक पवित्रा घेतला. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या विधेयकाबाबतची माहिती देणारी 'एक्स'वरील पोस्ट हटवली. तर विधेयकाला मंजुरी देणाऱ्या मंत्र्यांनी कोणतीही भीती किंवा शंका बाळगण्याचे कारण नाही. यावर अधिक चर्चा करू, असे उद्योगांना आश्वस्त केले. दरम्यान, उद्योग क्षेत्रातून या प्रस्तावित आरक्षणावर आक्षेप नोंदवण्यात आले. ही हुकूमशाही असून दूरदर्शी पाऊल नाही, असा आरोप त्यांनी केला.

राज्य मंत्रिमंडळाने सोमवारी 'कर्नाटक राज्य उद्योग, कारखाने आणि अन्य आस्थापनांमध्ये स्थानिक उमेदवारांना रोजगार देण्यासंबंधी विधेयक २०२४'ला मंजुरी दिली होती. यामध्ये खासगी कंपन्यांनी कन्नड भाषिकांना आरक्षण देणे अनिवार्य करण्याची तरतूद आहे.



'कन्नडिगांना आपल्या मातृभूमीत चांगले जीवन जगण्याची संधी द्यायला हवी. आमचे सरकार त्यांच्या हिताचे आहे. कन्नड भाषिकांचे कल्याण हे आमचे प्राधान्य आहे,' असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी अधोरेखित केले. पायाभूत सुविधा विकास, उद्योगमंत्री एम. बी. पाटील यांनीही विधेयकाला पाठबळ दिले. कर्नाटकमध्ये कन्नडिगांना नोकऱ्या मिळायला हव्यात, यात कोणतीच शंका नाही, असे ते म्हणाले. मात्र त्याच वेळी उद्योगांच्या हितांचे रक्षण केले जाईल. विधेयकाबाबत कोणताही संभ्रम दूर करण्यासाठी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, आयटी–बीटी, कायदा आणि कार्मिक मंत्र्यांशीची चर्चा केली जाईल, असेही त्यांनी अधोरेखित केले. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी या विधेयकाचे स्वागत केले. 'कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार कन्नडिगांचा सन्मान कायम राखण्यासाठी आले आहे,' असे ते म्हणाले.

### विधेयकात काय?

प्रस्तावित विधेयकानुसार, 'कोणताही उद्योग, कंपनी किंवा अन्य आस्थापनांमध्ये व्यवस्थापन स्तरावर ५० टक्के आणि बिगर व्यवस्थापन श्रेणीत ७० टक्के आरक्षण स्थानिकांना देणे अनिवार्य असेल. उमेदवाराकडे कन्नड भाषेसह माध्यमिक शालेय प्रमाणपत्र नसल्यास त्याला नोडल संस्थेद्वारे घेतलेल्या कन्नड प्राविण्य परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल, असेही त्यात म्हटले आहे.

## महिला कार्यकर्त्याचे धक्कादायक कृत्य

# भरसभेत बसप नेत्याच्या कानशिलात लगावली

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नागपूर** प्रतिनिधी

बसपच्या प्रदेशाध्यक्षपदी नवीन नियुक्ती झाली तरी, असंतोष आणि गटबाजी थांबलेली नाही. मुंबईत बुधवारी राज्य समितीच्या बैठकीत भंडारा जिल्ह्यातील महिला कार्यकर्त्याने प्रदेश प्रभारी खासदार रामजी गौतम यांच्या थेट कानशिलात लगावली. अचानक घडलेल्या या प्रसंगाने संपूर्ण सभागृह अवाक झाले आणि कार्यकारिणीची विस्तारही लांबला.

विधानसभा निवडणुकीच्या तयारींतर्गत बसपची संघटनात्मक फेररचना करण्यात येत आहे. परमेश्वर गोणारे यांना पायउतार करून ॲड. सुनील डोंगरे यांची प्रदेशाध्यक्ष नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीनंतर मुंबईत बुधवारी पहिलीच राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. यात पदाधिकाऱ्यांची घोषणा व जबाबदारी निश्चित करून आगामी काळातील कार्यक्रम दिले जाणार होते. बैठकीच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या स्वागतासाठी भंडारा जिल्ह्याच्या अड्याळ येथील रहिवासी निमा रंगारी कार्यकर्त्यांसह रांगेत व्यासपीठावर गेल्या. स्वागताचा स्वीकार करणारे रामजी गौतम यांचे स्वागत करण्याऐवजी रंगारी यांनी त्यांच्या



कानाखाली आवाज केला. त्यामुळे सभागृहात गोंधळ उडाला तर, दुसरीकडे 'सुनील डांगरे मुर्दाबाद'च्या घोषणा सुरू झाल्या. अन्य कार्यकर्त्यांनी मध्यस्थी केली. रंगारी यांना बाजूला करून पोलिसांच्या स्वाधीन केले. तसेच, असंतोष व्यक्त करणाऱ्या कार्यकर्त्यांसोबत मारहाण झाली. सभागृहात प्रचंड गोंधळ झाल्याने कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली नाही. निमा रंगारी यांनी विधान परिषदेच्या नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढवली. त्यांना सहा मते मिळाली होती. त्यापूर्वी जिल्हा परिषदेची निवडणूकही लढल्या होत्या. लोकसभेत त्यांनी भंडारा–गोंदिया मतदारसंघात दावा केला होता. प्रदेश प्रभारी रामजी गौतम आणि तत्कालीन प्रदेशाध्यक्ष परमेश्वर गोणारे यांनी आश्वासन दिल्यानंतरही त्यांना संधी मिळाली नाही. त्यामुळे नाराज झालेल्या रंगारी यांनी असंतोषाला वाट मोकळी करून दिली. या बैठकीसाठी नागपुरातून योगेश लांजेवार, नागोराव जयकर, पृथ्वी शेंडे, उमेश मेश्राम, मंगेश ठाकरे आदी गेले होते.

### पैसे घेऊन उमेदवार निश्चित केले!

निवडणुकीत उमेदवारी दिली नाही. पैसे घेऊन उमेदवार निश्चित करण्यात आले. पक्षाध्यक्ष मायावती यांच्याबद्दल कुठलाही नाराजी नाही. मात्र, राज्यात सुरू असलेल्या गोंधळाबद्दल सर्वसामान्यांच्या भावना व्यक्त केल्या, असे निमा रंगारी म्हणाल्या. याबाबत ॲड. सुनील डोंगरे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## उदय सामंतांना विश्वास : ठाकना लगावला टोला

# महायुतीचचे सरकार राज्यात येणार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नागपूर** प्रतिनिधी

शिवसेना ठाकरे गटाने २८८ मतदारसंघात चाचपणी करणे म्हणजे सर्व जागांवर उमेदवार आहेत की नाही, या चिंतेतून ही कसरत असावी, असा टोला उद्योग मंत्री उदय सामंत यांनी लगावला. गडचिरोली येथील दहा हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाच्या भूमिपूजनानिमित्त येथे आले असता पत्रकारांशी बोलताना सामंत म्हणाले, उबाठा हा स्वतंत्र पक्ष आहे. त्यांनी कुणासोबत आघाडी, युती करावी हा त्यांचा प्रश्न आहे. स्वबळाचा विचार मनात असेल किंवा उमेदवार आहे की नाही जाणून घेण्यासाठी सर्व मतदारसंघात चाचपणी करत असावे. किती उमेदवार आहेत, हे त्यानंतरच कळेल.

विशालगडाबाबत जात, धर्माचे राजकारण



कुणीही करू नये. अतिक्रमणामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला. निवडणूक आल्या की जातीपातीचे धर्माचे राजकारण करून महाराष्ट्र भडकवण्याचे काम करू नये, असेही सामंत यांनी एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी यांना सुनावले. सत्ता परिवर्तन होईल, असे आदित्य ठाकरे अडीच वर्षांपासून बोलत आहे. राज्यात महायुतीचेच सरकार परत येईल, या सरकारला काहीच होणार नाही. शेकापचे नेते जयंत पाटील यांची मते फुटली. एका चांगल्या पक्षाच्या नेत्याला संपवण्याचे काम महाविकास आघाडीने संयुक्तपणे केले, असा आरोपही सामंत यांनी केला.

गडचिरोलीतील प्रकल्प जिल्ह्यासाठी क्रांतिकारी आणि राज्याच्या औद्योगिक क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आहे. दावोस करारावरील टीकेला या प्रकल्पातून उत्तर मिळाले आहे. माओवादग्रस्त जिल्हा हा ठपका पुसून औद्योगिक नगरी करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचे मोठे योगदान आहे, असेही सामंत म्हणाले. कारखान्यात स्थानिकांना रोजगार द्यावा, असा सरकारचा निर्णय आहे. ७५ टक्केहून अधिक स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. इतर राज्यांच्या आधी महाराष्ट्रात हा निर्णय झालेला आहे. अन्य राज्यात ५० ते ७० टक्केपर्यंत प्रमाण आहे.

### मराठा आरक्षणाचा तिढा सुटणार?

**आंतरवाली सराटी –** 'मराठा' आरक्षणाचा प्रश्न अद्यापही सूटलेला नाही. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या एक वर्षापासून मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत. अशातच गुरुवारी बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी जरांगे पाटील यांची आंतरवाली सराटी येथे भेट घेतली आहे. आमदार राजेंद्र राऊत यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळख आहे. मनोज जरांगे पाटील यांनी या आधी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यावेळेस उपोषण सोडवण्यात आमदार राजेंद्र राऊत यांनी मध्यस्थी केली होती. आमदार राजेंद्र राऊत यांच्यावर मनोज जरांगे यांनी काल टीका केली होती.

## महत्वाचे

### राज ठाकरे दोन महिन्यांनी जागे झाले तर...'!

**मुंबई –** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी आषाढी एकादशीनिमित्त सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टवरुन राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी त्यांना खोचक टोला लगावला आहे. राज ठाकरेंनी आषाढीच्या शुभेच्छा देणारी एक पोस्ट आपल्या अधिकृत अकाऊंटवरुन पोस्ट केली होती. यामध्ये त्यांनी आवर्जून 'महाराष्ट्रात गेल्या दशकभरात जे जातीपातीचे विष पसरले ते समूळ नष्ट होऊ दे' असा उल्लेख केला होता. राज यांनी केलेल्या या उल्लेखाचा रोख शरद पवारांकडे असल्याची चर्चा होती. या पोस्टवर अशा काही कमेंट्सही आल्या. इतकेच नाही तर थेट शरद पवारांनाच यावरुन विचारण्यात आले असता त्यांनी आपल्या खास शैलीत राज यांनाच यावरुन टोला लागावला. शरद पवार म्हणाले की, राज ठाकरे दोन महिन्यांनी जागे झाले तर त्यात काही विशेष नाही.

आषाढी एकादशीच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा. गेली आठ शतके विठ्ठलाच्या ओढीने पंढपुराला लाखो भक्त न चुकता प्रस्थान करतात. माझ्या मते जगातील अशी एकमेव आणि इतकी दीर्घ परंपरा असेल. म्हणजे आपल्या परंपरेत वारीसारखे काही नाही, असे नाही. 'यात्रा' ही आपल्या हिंदू परंपरेचा अविभाज्य भाग. पण चारधाम यात्रा असो की काशीची यात्रा असू दे, त्या सगळ्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावरच्या. त्या देखील एकदाच घडतात. पण वारीचे असे नाही. विठ्ठलाच्या ओढीने दरवर्षी, नेमाने, पायी, शेकडो मैल प्रवास करावयाचा, उन्हात, पावसापाण्यात, पडतील त्या हालअपेष्टा सोसत. वारकरी आपल्या गावातील दिंडीसोबत निघतात, अशा शब्दांमध्ये राज यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

### शंभर टक्के निवडून येणाऱ्या ऐंशी जागांचा विचार सुरू

**मुंबई –** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी महायुतीतील जागावाटप आणि त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस ८० जागांवर निवडणूक लढवेल. शंभर टक्के निवडून येणाऱ्या त्या ८० जागा निवडण्यासाठी पक्षाने राज्यभर सर्वेक्षण सुरू केल्याचा दावा आत्राम यांनी केला आहे. तर अनिल देशमुख यांच्याविरोधात अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा विशेष प्लॅन असल्याचा खुलासाही आत्राम यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी महायुतीतील जागावाटप आणि त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस ८० जागांवर निवडणूक लढवेल. शंभर टक्के निवडून येणाऱ्या त्या ८० जागा निवडण्यासाठी पक्षाने राज्यभर सर्वेक्षण सुरू केले असल्याचा दावाही आत्राम यांनी केला. आमचे टार्गेट ८० जागा लढवण्याचे असून त्यावर १०० टक्के निकाल मिळवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. राज्यात कुठे कुठे जागा निवडून येऊ शकते? त्या संदर्भात सर्वे क्षण आणि पक्षांतर्गत विचार विनिमय सुरू केल्याचे आत्राम म्हणाले आहेत.

# भाकरी फिरली नाही तर ती करपणारच!

**मन की बात**
**दीपक कुलकर्णी**
९९६०२१०३११

लो कसभा निवडणुकीच्या जय–पराजयाचे कवित्व संपत नाही तोच आता विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजू लागला आहे. राज्यातील २८८ जागांसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली असली तरी युती–आघाडीच्या बेड्यांमध्ये अडकलेले पक्ष स्वत:च्या अस्तित्वासाठी झगडतांना दिसत आहेत. भाजपाचे सर्वाधिक आमदार असतांनाही त्यांना शिंदेसेना आणि अजित पवारांशी जुळवून घ्यावे लागत आहे. सत्तेसाठी काय काय करावे लागते हे उभा महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. जळगाव जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी तीनही मंत्री प्रयत्नांची पराकाष्टा करतांना दिसत असले तरी परवाचे मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांचे वक्तव्य बरेच काही सांगून जाते. मंत्री अनिल पाटील यांच्या म्हणण्यानुसार 'ज्याचा विद्यमान आमदार तो मतदारसंघ त्या पक्षाला' असे झाले तर भाजपाला जिल्ह्यात दुसरे स्थान घ्यावे लागणार आहे. कारण शिंदेंच्या सेनेचे सर्वाधिक पाच आमदार जिल्ह्यात आहेत. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा एकमेव मतदारसंघावर वरचष्मा आहे. रावेर मतदारसंघात काँग्रेसचे वर्चस्व असून तेथे भाजप यावर्षी तगडा उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. मंत्री अनिल पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला तर भाजपाला बालेकिल्ल्यात लहान भावाची जबाबदारी निभवावी लागणार असून शिंदेसेनेच्या वाट्याला तब्बल पाच जागा मिळणार आहेत. अजित पवार यांच्या पक्षाचे केवळ अनिल पाटील हे एकमेव आमदार असून ते सध्या कॅबिनेट मंत्री देखील आहेत; अनिल पाटील यांच्या अमळनेर मतदारसंघाचे वैशिष्ट्य असे आहे की, तेथे विद्यमान आमदाराला पुन्हा दुसऱ्यांदा मतदार संधी देत नाहीत असेच झाले तर त्याचा फटका खुद्द मंत्री पाटील यांनाच बसण्याची शक्यता अधिक आहे. राजकीय परिस्थिती अतिशय डळमळीत झालेली असतांनाही जिल्ह्यात जर उमेदवाराची 'भाकरी' फिरविली नाही तर ती 'करपण्याचीच' अधिक शक्यता आहे. कारण बहुतांश विद्यमान आमदारांच्या विरोधात रोष व्यक्त होत आहे. बऱ्याच ठिकाणी तर महायुतीतच वादाचे नाट्य सुरु झाले आहे. विद्यमान आमदारांनाच पुन्हा संधी दिली तर बंडखोरीची लागण इतक्या जोरात होईल की त्यावर इलाज करणे देखील जड जाणार आहे. लोकसभेत महाविकास आघाडीला जिल्ह्यात यश मिळाले नसले तरी त्यांनी जो मतदानाचा टक्का स्वत:च्या खात्यात वाढवून घेतला आहे त्यातून त्यांचे मनोबल बऱ्यापैकी उंचावले आहे. विधानसभा निवडणुकीत त्याचा उपयोग कसा करुन घेता येईल यावर महाविकास आघाडीचा भर असून त्यांचे नेते एकमेकांपासून अंतर ठेवून नसून ते अधिक जवळ येत आहेत. हे चित्र मात्र महायुतीत दिसत नाही. महायुतीत नेत्यांची तोंड चौफेर फिरत आहेत. समन्वयाचा अभाव महायुतीत मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. रक्षा खडसे यांच्या रुपाने केंद्रात राज्यमंत्रीपद व जळगाव मतदारसंघात पहिल्या महिला खासदार म्हणून स्मिता वाघ यांची निवड झाली असतांनाही महायुतीने त्यांचा साधा 'सत्कार' सोहळ्याचे आयोजन केले नाही यावरुनच त्यांच्यातील समन्वय कसा आहे हे लक्षात येते.

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली असली तरी सामान्य माणसांच्या अडचणी सोडविण्यासाठी कुणीही पुढाकार घेतांना दिसून येत नाही. जिल्ह्यात राज्यातील तीन तर केंद्रातील एक राज्यमंत्री असतांनाही एकही नियोजन समितीचे बैठक अद्याप झालेली नाही. विकासाचा रोडमॅप जोपर्यंत जनतेसमोर जात नाही तो पर्यंत जनता राजकीय पक्षांवर विश्वास ठेवत नाही हा अनुभव असतांनाही सत्ताधारी महायुती मात्र आपल्याच भ्रमात हिंडतांना दिसून येत आहे. तर दुसरीकडे विरोधक मात्र वेगवेगळ्या विषयांवर प्रकाश टाकीत आंदोलनाचे हत्यार उपसत आहेत. असो अनेक मतदारसंघात यावेळी उमेदवारीची भाकरी फिरणे क्रमप्राप्त झाले आहे तसे झाले नाही तर भाकरी करपणार अन् विजयाचा मार्ग अपयशाच्या स्थानकावर जाणून थांबणार हे तेवढेच खरे!

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम–१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर – No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १५ वे. जळगाव फोन नं. ०२५७–२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई– १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.